कृषीवल
रायगड, रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६
किंमत ४ ₹

## आज सादर होणार अर्थसंकल्प

**नवी दिल्ली :** आज १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर करणार आहेत. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच अर्थसंकल्प रविवारी मांडला जाणार असून, सीतारामन सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. त्यामुळे या अर्थसंकल्पाकडे देशाचे लक्ष लागले आहे. यंदा कृषी क्षेत्राला मोठ्या अपेक्षा आहेत. कृषी बजेट १.२७ लाख कोटींवरून सुमारे १.५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता व्यक्त होते. पीएम-किसान, फसल विमा आणि कृषी आदी योजनांना अधिक निधीची अपेक्षा वर्तवण्यात आली आहे.

## शिक्षकेतर संघटनांचे आज अधिवेशन

**अलिबाग :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळाचे ५३ वे राज्यस्तरीय अधिवेशन एक फेब्रुवारी रोजी लोकमान्य टिळक सभागृह चेंबूर, मुंबई येथे होणार आहे. महामंडळाच्या राज्यव्यापी अधिवेशनात शिक्षकेतर बांधवांच्या प्रलंबित प्रश्नावर विचार विनिमय, चर्चासत्र, परिसंवाद होणार आहे. यामध्ये अनेक शिक्षणतज्ज्ञ, विचारवंतांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या अधिवेशनासाठी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षक आमदार विक्रम काळे, आ.जयंत तासगावकर, पदवीधर आ. निरंजन डावखरे, आ. सत्यजित तांबे, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे •> पान २ वर

# पाट्या, नारळांचे राजकारण संपवा

## कार्यकर्त्यांनो कामाला लागा; जयंत पाटील यांचे आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**थळ मतदारसंघात प्रत्यक्ष काम करणारा पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाने आपली ओळख निर्माण केली आहे. विकासाच्या नावाखाली फक्त पाट्या आणि नारळ फोडण्यापेक्षा शेकापने तळागाळातील जनतेसाठी न बोलता काम करून दाखवले आहे. या सर्व कामांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केला असून, सामान्य माणूस हाच विकासाचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी कृतीतून सिद्ध केले आहे. या निवडणुकीत सुरेश घरत यांची कन्या सानिका घरत मैदानात उतरली आहे. उच्चशिक्षित, अभ्यासू आणि तरुण चेहरा म्हणून सानिका घरत या थळ जिल्हा परिषद मतदारसंघाला नवी दिशा देऊ शकतात. त्यामुळे ही निवडणूक केवळ उमेदवाराची नसून, प्रामाणिक काम करणाऱ्या शेकापच्या विचारांची आहे, असे ठाम प्रतिपादन शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले. थळ जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार सानिका सुरेश घरत यांच्या प्रचारार्थ वरसोली तसेच थळमध्ये सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.**



यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, तालुका चिटणीस सुरेश घरत, थळ जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार सानिका सुरेश घरत, थळ पंचायत समिती मतदारसंघातील उमेदवार श्वेताली नरेंद्र थळकर आदींसह शेकाप, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे शेकाप सरचिटणीस जयंत पाटील म्हणाले की, सत्तेच्या जोरावर राजकारण करणाऱ्यांना थळमध्ये धडा शिकवण्याची हीच वेळ असून, सर्व कार्यकर्त्यांनी घराघरांत जाऊन शेकापचा झेंडा बुलंद करावा आणि सानिका घरत यांना बहुमताने विजयी करावे, असे आक्रमक आवाहन जयंत पाटील यांनी केले. तसेच अलिबाग तालुक्याचा विकास हा शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून केला आहे. वरसोलीतील अनेक प्रश्न आपण पक्षाच्या माध्यमातून सोडविले आहेत. त्यामुळे आजही वरसोली येथील असंख्य नागरिक शेकापच्या पाठीशी कायम आहेत. वरसोलीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

थळमधील आरसीएफ कंपनीमधील स्थानिकांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शेकापने कायम प्रयत्न केले आहेत. या भागातील कोळी समाजाचा विकास साधण्यासाठी भविष्यात उपाययोजना करु. व्यापाऱ्यांची असलेली मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी आगामी काळात एक वेगळी भूमिका घेतली जाणार आहे. गावे, वाड्यांचा विकास अधिक वृद्धिंगत कसा होईल याकडे पाहिले जाईल, असेही जयंत पाटील म्हणाले.

### गावांतील विकासासाठी कटिबद्ध : सानिका घरत

थळ जिल्हा परिषद मतदारसंघातील उमेदवार आहे. मी तरुण पिढीची उमेदवार आहे. त्यामुळे तरुण पिढीच्या समस्या निश्चितच समजू शकते. हा जो आपला विभाग आहे, त्याठिकाणी मासेमारी करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. शासनाच्या उदासीनतेमुळे मासेमारी व्यवसाय मागे पडत आहे. हा व्यवसाय वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्या दृष्टीने तयारी केली जाईल. रस्ते, पाणी आदी समस्या या भागात आहेत. त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. तरुणवर्गाला पुढे येण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यांना योग्य तो रोजगार मिळाला पाहिजे, जेणेकरून त्यांचे आणि त्यांच्या भविष्याचे प्रश्न सुटतील. या भूमिकेतून आगामी काळात काम करण्याचा एक मानस आहे. या सर्व कामांना प्राधान्याने सोडविण्याचा शंभर टक्के प्रयत्न करणार आहे.

### जनशक्तीची लढाई जिंकरणारच : सुरेश घरत

प्रचाराला चांगला पाठिंबा मिळत आहे. सर्व श्रेय माझ्या गावाला जात आहे. वरसोली व अनेक गावांमध्ये आपण कामे केली आहेत. या मतदार संघात विरोधकांनी एक वेगळी दहशत निर्माण केली आहे. या दहशतीविरोधात ही लढत आहे. दहशत मोडीत काढण्यासाठी रणशिंगे फुंकले आहे. कोरोनाच्या काळात आमदार कुठे होते? त्यावेळी अडचणीच्या काळात शेकाप प्रवक्त्या चित्र-लेखा पाटील जनतेच्या हितासाठी धावून आल्या. आपल्यायला आमदारकीच्या अपमानाचा बदला घ्यायचा आहे. सानिकाला निवडून देण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. सानिकाला निवडून आणून या मतदारसंघाचा विकास करायचा आहे. धनशक्ती विरुध्द जनशक्ती ही लढाई आहे. ती जिंकण्यासाठी सज्ज व्हावा, असे आवाहन तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केले.

### ‘मक्तेदारी मोडीत काढा’

आजची लढाई लढत असताना रस्ते, पाण्यापुरता समस्या मर्यादित राहिल्या नाहीत. येथील मच्छिमांरासह खेळाडूंचे प्रश्नही कायमच आहेत. रोजगाराचे प्रश्नही गंभीर आहे. आरसीएफसारखी कंपनीजवळ असताना बेकारीचे जीवन जगण्याची वेळ स्थानिकांवर आली आहे. मग येथील आमदार आणि सदस्यांनी काय केले? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सानिका घरत निवडून आल्यावर पहिले आंदोलन आरसीएफ कंपनीवर असणार आहे. येथील स्थानिकांसाठी ऑफलाईन परीक्षा झाली पाहिजे, त्यांना कंपनीत प्राधान्याने कायम घ्यावे, ही प्रमुख मागणी राहणार आहे. या मतदार संघात असलेली विरोधकांची मक्तेदारी दहशत मोडीत काढण्यासाठी ही लढाई असणार आहे. ही दहशत मोडीत काढण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केले.

# मी सुनेत्रा अजित पवार...

## सुनेत्रा पवारांनी घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत निधन झाल्यानंतर राज्यासह देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महत्त्वाचा निर्णय घेत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची शनिवारी (दि.३१) विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली आहे. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मोजक्या नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने हा शपथविधी सोहळा लोकभवनातील दरबार हॉलमध्ये पार पडला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना मंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

या कार्यक्रमासाठी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यसचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी उपस्थित होते. गटनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा देखील राजीनामा दिला.



सुनेत्रा पवार या शुक्रवारी रात्रीच बारामतीतून मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. शनिवारी सकाळपासून मुंबईत राजकीय •> पान २ वर

### पवारांच्या खात्यांमध्ये ‘अर्थ’ नाही

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ ही तीन खाती देण्यात आली असली, तरी चर्चेतील अर्थ खाते मात्र त्यांना देण्यात आलेले नाही. राष्ट्रवादीला अर्थ खातं मिळावं, यासाठी अजित पवार फार आग्रही होते. म्हणून खातेवाटप होताना अर्थ खातं हे राष्ट्रवादीला देण्यात आलं होतं. परंतु, आता अर्थ व नियोजन खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच ठेवण्यात आले आहे.

### घरापासून राजकारणापर्यंतचा प्रवास

लग्नानंतर अजित पवार यांच्यासोबत शेतकाम, पोल्ट्री व्यवसाय ते गाईगुरे सांभाळणे, दूध काढणे अशी सर्व कामं सुनेत्रा पवार यांनी आवडीने केली. अजित पवार यांच्या राजकीय वाटचालीत आपली घरं सांभाळणे, नातेसंबंध जपणं, सामाजिक कार्य करणं, कठीणप्रसंगी दादांना साथ देणं आणि सल्लामसलत करणं, ही जबाबदारी त्यांनी पार पडली. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच त्यांच्या नावावर आज पहिली महिला उपमुख्यमंत्री असा एक मोठा विक्रम नोंद झाला. या आधी कोणत्याही महिलेने या पदावर काम केलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा प्रत्यक्षामध्ये राजकारणात प्रवेश झाला.

# शेकाप नेते रामभाऊ कोशेंचे निधन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील रामभाऊ कोशे यांचे निधन झाल्याने चौक परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, नि:स्पृह, निष्ठावंत कार्यकर्ते, कधीही तत्त्वाशी तडजोड न करणारे, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आयुष्यभर समाजसेवा करणारे रामभाऊ कोशे यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाल्याने चौक परिसरात हळहळ व्यक्त झाली आहे.

लोकनेते, माजी खासदार दि.बा. पाटील यांचे खंदे समर्थक, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रभाकर पाटील यांचे विश्वासू, वाजेकर शेठ, माजी आमदार सुमंतराव राऊत, माजी आमदार विवेक पाटील यांच्या साथीने त्यांनी अनेक चळवळीत भाग घेऊन समाजकार्य केले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांचा सक्रीय सहभाग असल्याने त्यांना कर्जत येथील कारागृहात ठेवण्यात आले होते. आणीबाणीच्या काळात ज्येष्ठ समाजवादी नेते एस.एम.जोशी यांनी रामभाऊ कोशे •> पान २ वर

# राज्यात अवकाळी पावसाची शक्यता

**नागपूर :** पुढील दोन ते तीन दिवसांत विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाच्या नागपूर केंद्राने वर्तवला आहे. विशेषतः पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशीम या जिल्ह्यांमध्ये २ ते ३ फेब्रुवारीदरम्यान हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागपूरसह संपूर्ण विदर्भात सध्या ढगाळ वातावरण पाहायला मिळत असून, याचा परिणाम तापमानावरही जाणवण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, उत्तरेकडून पश्चिमेकडे एक विक्षोभ सरकत आहे. या विक्षोभाचा परिणाम विदर्भावर होत असून, त्यामुळे आकाशात ढगांची दाटी निर्माण झाली आहे.

## वे|ध|क

### ‘त्या’ नगरसेवकांवर अपात्रतेची तलवार

**पनवेल :** मुंबई : वसई-विरार महापालिकेच्या निवडणुकीनंतर आता बहुजन विकास आघाडी आणि भाजपमध्ये नगरसेवक अपात्रतेची लढाई रंगली आहे. भाजपने बहुजनच्या निवडून आलेल्या १६ नगरसेवकांना अपात्र ठरविण्यासाठी न्यायालयात धाव घेतली आहे. त्याचवेळी बहुजन विकास आघाडीकडून भाजपच्या २३ निवडणूक लढविलेल्या उमेदवारांच्या विरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. या दोन्ही अर्जांवर न्यायालयात ५ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे.

### भारतीय संघाकडून धावांचा डोंगर

**नवी दिल्ली :** ‘भारत विरुद्ध न्यूझीलंड संघात तिरुअनंतपूरम येथे शनिवारी (३१ जानेवारी) होत असलेला पाचवा टी इशान किशनने गाजवला आहे. इशान किशनने या सामन्यात शतक केले आहे. तसेच सूर्यकुमार यादवने अर्धशतक त्यामुळे भारताने या सामन्यात न्यूझीलंडसमोर विक्रमी २७२ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. .भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे भारताकडून अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी डावाची सुरुवात केली होती. मात्र, दोघेही स्वतःत बाद झाले. त्यानंतर आलेल्या कर्णधार सूर्यकुमारने ३० चेंडूत तडाखेबाज ६३ धावा चोपून काढत गोलंदाजांची धुलाई केली.

# जावयानेच केला खून

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील चौल गावातील टेकाळकर आळी येथे राहणाऱ्या ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या खून आणि जबरी चोरीच्या प्रकरणाचा रायगड पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत उलगडा केला आहे. याप्रकरणी मयत महिलेचा जावई असलेल्या मुख्य आरोपीसह चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

मंदा प्रमोद म्हात्रे (७०) या चौल, ता. अलिबाग येथे एकट्याच राहात होत्या. २८ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊपूर्वी अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या घरात घुसून त्यांचा खून केला आणि अंगावरील सोन्याचे दागिने जबरी चोरीने लंपास केले. या घटनेनंतर २९ जानेवारी रोजी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



- **चौलमध्ये वृद्ध महिलेच्या खुनाचा ४८ तासांत उलगडा**
- **चार आरोपी पोलिसांच्या ताब्यात**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक •> पान २ वर

# पनवेलमध्ये लोकशाहीचा ‘बाजार’?

## ■ स्वीकृत नगरसेवकपदासाठी एक कोटींची बोली

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीची धूळ खाली बसत नाही तोच राजकीय वर्तुळात ‘खोक्यांच्या’ चर्चेने खळबळ उडाली आहे. १५ जानेवारीला पार पडलेल्या निवडणुकीत सत्ताधारी गोटाने स्पष्ट वर्चस्व मिळवले असले, तरी आता स्वीकृत नगरसेवक पदांवरून पैशांचा खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. विशेष म्हणजे, हा आरोप सत्ताधारी पक्षातील ज्येष्ठ नेते रमेश गुडेकर यांनीच केल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

गुडेकर यांच्या आरोपानुसार, स्वीकृत नगरसेवक पदासाठी ‘‘एक जागा, एक कोटी’’ असा व्यवहार सुरू असल्याची चर्चा आहे. निवडणुकीत पक्षासाठी झटलेल्या, कर्ज काढून प्रचार केलेल्या कार्यकर्त्यांना डावलून, पैशाच्या जोरावर बाहेरचे धनदांडगे नगरसेवक बनण्याच्या तयारीत असल्याचा दावा त्यांनी केला. ‘‘ज्यांनी पक्षाचा झेंडा खांद्यावर घेतला, त्यांनाच संधी मिळाली पाहिजे; अन्यथा कार्यकर्त्यांचा विश्वास उडेल,’’ असा इशारा त्यांनी दिला.




> **ज्यांनी प्रामाणिकपणे निवडणूक लढवली, पक्ष टिकवला, त्यांनाच संधी मिळायला हवी. अन्यथा पक्षाची अवस्था ‘असून अडचण, नसून खोळंबा’ अशी होईल.**
> **– रमेश गुडेकर, ज्येष्ठ नेते**

या निवडणुकीत महाआघाडीच्या काही उमेदवारांनी माघार घेतल्याने सत्ताधारी गटाचे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. तेव्हाही ‘घोडेबाजार’ झाल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. आता स्वीकृत पदांसाठी कोट्यवधींच्या बोली लागत असल्याच्या •> पान २ वर

# रेशनसाठी आदिवासींची पायपीट

## रामराज ग्रामपंचायतीतील आदिवासी बांधवांची व्यथा

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रामराज ग्रामपंचायत परिसरातील आदिवासी बांधवांना आजही रेशनसारख्या मूलभूत गरजेसाठी मोठा मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. पिंपळवाडी, नवघर, खैरवाडी, जांभूळवाडी तसेच परिसरातील विविध वाड्या-वस्त्यांमधील आदिवासी नागरिकांना रेशनसाठी पाच ते सहा किलोमीटर अंतर कापत रामराजपर्यंत यावे लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

रामराज ग्रामपंचायत क्षेत्रफळाने मोठी असून वाड्या वस्त्या दूरदूर पसरलेल्या आहेत. खराब रस्ते, अपुरी वाहतूक व्यवस्था आणि प्रवासी सुविधांचा अभाव यामुळे हा प्रवास अनेकांसाठी कठीण ठरतो. विशेषतः वृद्ध, महिला आणि लहान मुलांसह रेशनसाठी येताना आदिवासी बांधवांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था अधिकच बिकट होत असल्याने हा त्रास आणखी वाढतो. अनेक आदिवासी कुटुंबांसाठी रेशन मिळवणे म्हणजे केवळ अन्नधान्याचा प्रश्न नाही, तर तो त्यांच्या दैनंदिन जगण्याचा संघर्ष बनला आहे. कामावर जाण्याची वेळ, मुलांच्या शाळा आणि घरातील जबाबदाऱ्या सांभाळत एवढा लांब प्रवास करणे त्यांच्या क्षमतेबाहेरचे ठरत आहे. या विषयाबाबत यापूर्वीही आदिवासी बांधवांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. मात्र आजपर्यंत त्यांचा प्रश्न प्रलंबितच आहे. •> पान २ वर

## तळोजात वकिलांसाठी देशातील पहिले प्रशिक्षण केंद्र | मुख्यमंत्री फडणवीस यांची दहा कोटींची घोषणा

# कायद्याच्या शिक्षणाला ‘कोर्ट क्राफ्ट’ची जोड

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या पुढाकारातून तळोजा (नवी मुंबई) येथे उभारण्यात आलेल्या ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर’ (BBATRC) या देशातील पहिल्यावहिल्या वकिलांसाठीच्या प्रशिक्षण व संशोधन अकॅडमीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले. कायद्याचे शिक्षण आणि प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज (कोर्ट क्राफ्ट) यातील दरी भरून काढणारा हा उपक्रम ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

> **बार कौन्सिलचा हा उपक्रम वकिलांसाठी नवे दालन उघडणारा ठरेल.**
> **– ॲड. हर्षद निंबाळकर, अध्यक्ष**

अकॅडमीचे उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर होते. मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ॲड. अनिल सी. सिंग, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे आणि गोव्याचे महाधिवक्ता ॲड. देविदास पांगम, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे उपाध्यक्ष ॲड. जयंत डी. जायभावे, बीबीएटीआरसीचे अध्यक्ष ॲड. डॉ. उदय पी. वारुंजीकर, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य ॲड. आशिष पी. देशमुख आणि समन्वयक व उपाध्यक्ष ॲड. संग्राम डी. देसाई उपस्थित होते. तसेच बार कौन्सिलचे सदस्य ॲड. मोतीसिंह जी. मोहता, •> पान २ वर



> **न्यायमूर्तींसाठी प्रशिक्षण अकॅडमी आहे, तर वकिलांसाठी का नाही? या प्रश्नाचे उत्तर आज मिळाले. कोर्ट क्राफ्ट शिकवणारी ही अकॅडमी काळाची गरज आहे.**
> **– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**



# खंडित वीजपुरवठ्याचा फटका

## ● कोलंबी व्यावसायिकाचे आर्थिक नुकसान



**। तळा । प्रतिनिधी ।**

गिरणे येथे वीजपुरवठा तब्बल १२ तास खंडित राहिल्याने कोळंबी प्रकल्प व्यावसायिकाचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याची घटना घडली आहे. शशांक वेदक यांचा गिरणे येथे कोळंबी प्रकल्प असून, गुरुवारी रात्री ११.५८ वाजता वीजपुरवठा खंडित झाला. नुकसान टाळण्यासाठी वेदक यांनी तत्काळ बॅकअपची व्यवस्था करून सुमारे ३ ते ४ तास प्रकल्प सुरू ठेवला. मात्र त्यानंतरही वीजपुरवठा पूर्ववत न झाल्याने त्यांनी रात्री २.२१ वाजता संबंधित कनिष्ठ अभियंता राहुल पाटील यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रतिसाद मिळाला नाही. अखेर दुसऱ्या दिवशी सकाळी ११.४८ वाजता वीजपुरवठा सुरळीत झाला.

दीर्घकाळ वीज नसल्यामुळे कोळंबीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे वेदक यांनी सांगितले. दरमहा एक ते सव्वा लाख रुपयांचे वीजबिल भरूनही महावितरणकडून अपेक्षित सेवा मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी महावितरण कार्यालयात चौकशी केली असता संबंधित अधिकाऱ्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही, असा आरोपही त्यांनी केला. याप्रकरणी वेदक यांनी रोहा येथील कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदन देऊन संबंधित कनिष्ठ अभियंत्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> गिरणे येथे असलेल्या कोळंबी प्रकल्पाचे महिन्याला एक लाख ते सव्वा लाख बिल आम्ही नियमित भरतो. मात्र, विद्युत पुरवठा खंडित झाला की तो का खंडित करण्यात आला आहे व कधी पर्यंत सुरळीत होईल याबाबत तळा महावितरण विभागाकडून काहीच माहिती दिली जात नाही. यामुळे मालाचे मोठे नुकसान होऊन आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते.
>
> – शशांक वेदक

> गिरणे येथील वीजपुरवठा रात्री बारा वाजता खंडित झाल्यानंतर कर्मचाऱ्यांकडून दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. सदर भाग हा घनदाट जंगलात येत असल्याने फॉल्ट शोधण्यास अडचण येत होती, तरीही कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर काम करून सकाळी सहा वाजेपर्यंत विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला.
>
> – राहुल पाटील, कनिष्ठ अभियंता, महावितरण तळा

या घटनेमुळे परिसरातील इतर मत्स्य व जलकृषी प्रकल्प व्यावसायिकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा प्रकारे दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित राहिल्यास लाखो रुपयांचे नुकसान होऊ शकते, तसेच उत्पादन साखळी पूर्णपणे विस्कळीत होते, असे मत व्यावसायिकांकडून व्यक्त केले जात आहे. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणने विशेष खबरदारी घ्यावी, तसेच औद्योगिक आणि कृषीपूरक प्रकल्पांसाठी स्वतंत्र तातडीची यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी स्थानिक व्यावसायिकांकडून होत आहे. या प्रकारामुळे महावितरणच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने याची गंभीर दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

## अजितदादांची शोकसभा

**उरण** :राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे दोन दिवसापूर्वी अपघाती निधन झाले होते. उरण राष्ट्रवादी काँग्रेस परिवार व महाविकास आघाडी वतीने भोईर गार्डन येथे शुक्रवारी (दि.३०) रोजी शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेस राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नगराध्यक्ष भावना घाणेकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस माजी आ. बाळाराम पाटील, माजी आ. मनोहर भोईर, नरेश रहाळकर, सरचिणीस मिलिंद पाडगावकर, संतोष पवार, गणेश शिंदे, बळीराम ठाकूर, किशोर ठाकूर, गणेश नलावडे, जइद मुल्ला, आनंद भिंगार्डे, मंगेश कांबळी, नगरसेविका, नगरसेवक, महाविकास आघाडीचे कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कार्यकर्ते यांच्यासह सामाजिक कार्यकर्त, मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्वांनी अजितदादा पवार यांच्या जीवनातील किस्से सांगितले.

## कळंबमध्ये ‘दंत सेवा’ दंत चिकित्सालयाचे लोकार्पण



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कळंब येथे आदिवासी व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या ‘दंत सेवा’ या दंत चिकित्सालयाचे उद्घाटन प्रजासत्ताक दिनी सायंकाळी उत्साहात पार पडले. या दवाखान्याचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते आवेश जुवारी यांच्या आई भानू जुवारी तसेच काका जब्बार जुवारी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

सालोख येथील सामाजिक कार्यकर्ते आवेश जुवारी यांनी आपल्या मुलाला वैद्यकीय शिक्षण देऊन ग्रामीण व आदिवासी बहुल भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उदात्त हेतूने कळंब येथे या दंत चिकित्सालयाची स्थापना केली आहे. या परिसरात आरोग्यविषयक सुविधा अत्यंत मर्यादित असून उपचारासाठी नागरिकांना शहरात जावे लागते. हीच गरज लक्षात घेऊन आदिवासी व ग्रामीण भागाच्या मध्यवर्ती ठिकाणी दवाखाना सुरू करण्यात आला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

‘दंत सेवा’ या नावाने सुरू करण्यात आलेल्या या दंत चिकित्सालयात अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात आल्या असून, दातांशी संबंधित विविध आजारांवर उपचारांची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, गोरगरीब रुग्णांसाठी अल्प दरात उपचार सेवा देण्याचा मानस दंत चिकित्सक डॉ. आशकार जुवारी यांनी यावेळी व्यक्त केला.

## अंजुमन महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

### ●मानसिक आरोग्यावर व्याख्यान संपन्न



**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

अंजुमन इस्लाम जंजीरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुडजंजीरा चे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच राष्ट्रीय सेवा योजना व डीएलएलई विभागाच्या संयुक्त विद्यमाने आणि लायन्स क्लब ऑफ श्रीबाग (अलिबाग) यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार व रस्ता सुरक्षा जनजागृतीपर वक्तृत्व, घोषवाक्य लेखन, निबंध लेखन, पोस्टर निर्मिती व पथनाट्य स्पर्धांचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ व मानसिक आरोग्यावर व्याख्यान दि.३१ जानेवारी रोजी महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात ‘‘माझा भारत, माझे मत/मतदार जनजागृती’’ या विषयासोबतच ‘‘रस्ता सुरक्षा : नियम पाळा, जीव वाचवा’’ या विषयांवर विद्यार्थ्यांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात मानसिक आरोग्य व रस्ता सुरक्षा या विषयावर संस्थापक अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ श्रीबाग अलिबाग लायन डॉ. ॲड. निहा अनिस राऊत यांनी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उपजिल्हा गव्हर्नर लायन प्रविण सरनाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विशेष पाहुणे म्हणून डॉ. नमिता मिश्रा, लायन डॉ. रेखा म्हात्रे, लायन डॉ अलोक मिश्रा. लायन विजय वनगे, लायन मकरंद कर्णिक यांनी उपस्थिती दर्शविली. लायन प्रवीण सरनाईक यांनी युवा वर्गास आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून समाजसेवेसाठी लायन्स इंटरनॅशनलचे महत्त्व नमूद करून त्यांना प्रेरीत केले. तसेच लायन नमिता मिश्रा व लायन डॉ. रेखा म्हात्रे यांनी हि उपस्थिताना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. साजिदशेखयांनीआपल्याअध्यक्षीय भाषणात अशा स्पर्धांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव, मतदानाबाबतची जबाबदारी तसेच सामाजिक प्रश्नांप्रती सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच २३ महाविद्यालये व ३७१ विद्यार्थ्यांचा सहभाग ही बाब विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीवेचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना चषक व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले, तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी फातिमा सुरवे व आयेशा देशमुख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिस्माह किल्लेदार, विद्यार्थी सई कोतवाल यांनी सहकार्य केले.

## वेदक कॉलेजमध्ये राष्ट्रीय वेबिनार

**। तळा । प्रतिनिधी ।**

जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा-रायगड येथील रसायनशास्त्र विभाग व अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड-जंजिरा यांच्या संयुक्त विद्यमाने ‘संशोधन लेख कसा लिहावा व प्रकाशनासाठी योग्य जर्नल कसे निवडावे’ या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील वेबिनारचे आयोजन करण्यात आले. हे वेबिनार (दि. ३१) जानेवारी रोजी गुगल मीट या ऑनलाईन माध्यमातून यशस्वीरित्या पार पडले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी संशोधन व शैक्षणिक प्रकाशनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी गुणवत्तापूर्ण व नैतिक संशोधनाकडे अधिक लक्ष द्यावे, असे आवाहन केले. रसायनशास्त्र विभागाची ओळख विभागप्रमुख जयदीप देवरे यांनी करून दिली व विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, संशोधनात्मक व विस्तार उपक्रमांची माहिती दिली.

## संपूर्ण राज्यात रायगड जिल्ह्याचा डंका

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

राजभवन आयोजित चॅलेंजर्स ब्रिगेड: आव्हान २०२५-२६ या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिरात रायगड जिल्ह्याच्या राष्ट्रीय सेवा योजना संघाने आपल्या अष्टपैलू कामगिरीने यशाचे शिखर गाठले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे पार पडलेल्या या शिबिरात ३६ जिल्ह्यांच्या स्पर्धेत रायगडने सर्वोत्तम मिरवणूक हा मानाचा पुरस्कार पटकावला.

मुंबई विद्यापीठाचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रा. सुशिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल यांच्या नियोजनाने हा संघ सज्ज झाला होता. शेठ जे.एन. पालीवाला महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल झेंडे यांनी संघाचे नेतृत्व केले. या यशात सी.के.टी. महाविद्यालय (पनवेल) आणि पाली-सुधागड महाविद्यालयाचे मोलाचे सहकार्य लाभले.



- **आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर**
- **सर्वोत्तम मिरवणूक पुरस्काराने सन्मानित**

या शिबिरात महाराष्ट्रातील २४ विद्यापीठांमधील १०४८ स्वयंसेवक आणि ८७ संघनायक सहभागी झाले होते. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना समर्थपणे तोंड देण्यासाठी राष्ट्रीय आपदा निवारण बलाच्या जवानांनी स्वयंसेवकांना सलग आठ दिवस खडतर प्रशिक्षण दिले. यात बचावकार्य, प्राथमिक उपचार, शिस्त, नेतृत्व गुण आणि आपत्कालीन व्यवस्थापनाचे बारकावे शिकवण्यात आले.

**कोकणच्या संस्कृतीचे अनोखे दर्शन**

शिबिरातील सांस्कृतिक मिरवणुकीत रायगडच्या संघाने कोकणच्या संस्कृतीचे दर्शन घडवले. पारंपरिक बाल्या नृत्याने मुलांच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. मुलींनी सादर केलेल्या कोळी नृत्यातून रायगडच्या लोकसंस्कृतीची भुरळ सर्वांना पडली. दोनच राजे इथे गाजले या नाटिकेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित स्वराज्य, न्याय व समतेचा संदेश देण्यात आला.

या प्रभावी सादरीकरणाची दखल घेत कुलगुरू डॉ. शरद रामराव गडाख यांच्या हस्ते रायगड जिल्ह्याला गौरविण्यात आले. कामगिरीबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे विशेष अभिनंदन केले आहे. या यशबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

पान १ वरून

## शिक्षकेतर संघटनांचे आज अधिवेशन

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनामध्ये राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती सुरु करणे, आश्वासित प्रगती योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे, अनुकंपा तत्वावरील पदांची नियुक्ती तात्काळ करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, वैद्यकीय रजा मंजूर करणे रजा साठवण्याची मर्यादा वाढविणे, रजा देयके मंजूर करणे, या अनेक प्रश्नांवर चर्चा होणार आहे. या राज्य अधिवेशनामध्ये विचार विनिमय करून संघटनेची पुढील ध्येयधोरणे ठरविले जाणार आहेत, अशी माहिती राज्य महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी दिली. या अधिवेशनास रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेतर बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रायगड जिल्हा शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष राजू रणवीर, सरचिटणीस लक्ष्मण ढेबे, कार्याध्यक्ष राजेश वाघमारे, उपाध्यक्ष सुरेश गावंड आदी मान्यवरांनी केले आहे.

## मी सुनेत्रा अजित पवार...

घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळाले होते. राष्ट्रवादीची गटनेतेपदाची महत्त्वपूर्ण बैठक विधिमंडळात पार पडली. यावेळी दिलीप वळसे पाटलांकडून गटनेतेपदाचा प्रस्ताव मांडण्यात आला. हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. छगन भुजबळ यांच्याकडून सुनेत्रा पवार यांच्या नावाला अनुमोदन देण्यात आले. यानंतर सुनेत्रा पवार यांची एकमताने गटनेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर धनंजय मुंडे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, संजय बनसोडे, सुनील तटकरे हे मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी वर्षा बंगल्यावर रवाना झाले. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन राष्ट्रवादीच्या नेत्यांनी गटनेते म्हणून सुनेत्रा पवार यांची निवड झाल्याचे पत्र दिले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ते पत्र राज्यपालांना पाठवण्यात आले.

त्यानुसार, शपथविधी सोहळा संध्याकाळी ५ वाजता पार पडला. मर्यादित लोकांना शपथविधीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली होती. शपथविधी सोहळा अवघ्या १० मिनिटांत अत्यंत साधेपणाने पार पडला. यावेळी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. सुनेत्रा पवार या महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत.

**शपथविधीनंतर सुनेत्रा पवार बारामतीकडे रवाना**

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार तातडीने बारामतीला रवाना होणार असल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवार यांचा दहावा होईपर्यंत त्या बारामतीतच मुक्काम करणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, दुखवटा संपेपर्यंत त्या नेते व कार्यकर्त्यांची भेट घेणार असल्या तरी, या काळात कोणतेही हार, तुरा किंवा सत्कार स्वीकारणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शोकाकुल वातावरणात साधेपणा आणि संवेदनशीलता जपण्यावर त्यांचा भर असणार आहे.

## शेकाप नेते रामभाऊ कोर्शेचे निधन

यांच्या घरी बैठक आयोजित केली होती. चौक येथील दूरसंचार केंद्र त्यांच्या प्रयत्नाने सुरू झाले. चौक प्रवाशी संघाचे ते संस्थापक अध्यक्ष होते. चौक परिसरातील ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी विद्या प्रसारणी सभा चौक या शिक्षण संस्थेचे संस्थापक सदस्य होते. या संस्थेचा आता वटवृक्ष झाला असून, अनेक विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. चौक येथे ज्येष्ठ नागरिक संघ स्थापन करण्यात त्यांचा सहभाग होता. १५ वर्षे त्यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी चौक येथे ज्येष्ठ नागरिक सभागृह हे त्यांनी माजी आमदार विवेक पाटील यांच्या माध्यमातून उभे केले.

## रेशनसाठी आदिवासींची पायपीट

परिणामी, बोरघर ग्रामपंचायतीप्रमाणे रामराज ग्रामपंचायतील नागरिकांनाही रेशनची सोय अधिक जवळ उपलब्ध व्हावी, अशी ठाम मागणी होत आहे. महान, महानवाडी आणि उमटे डेपो ही ठिकाणे मध्यवर्ती असल्याने तेथे रेशनची सोय उपलब्ध झाल्यास आदिवासी कुटुंबांचा मोठा प्रश्न सुटू शकतो. जवळच रेशन मिळावे, ही केवळ सोयीची बाब नसून आदिवासी बांधवांचा मूलभूत हक्क आहे, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. शासनाच्या विविध योजनांची घोषणा होते, मात्र त्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत आहेत का, असा सवाल रामराज परिसरात उपस्थित होत आहे. रामराज ग्रामपंचायत क्षेत्रातील आदिवासी बांधवांचा हा त्रास आणि मागणी शासनाने गांभीर्याने लक्षात घ्यावी आणि तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

## पनवेलमध्ये लोकशाहीचा ‘बाजार’?

आरोपामुळे पनवेलमधील राजकारण पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. पनवेल महापालिकेत एकूण ७८ नगरसेवकांपैकी ७ जागा स्वीकृत नगरसेवकांसाठी आहेत. त्यातील ५ जागा सत्ताधारी गटाला, तर २ जागा महाविकास आघाडीला मिळणार आहेत. या जागांवर कोणाची वर्णी लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सत्ताधारी पक्षातील नेत्यानेच केलेल्या या आरोपांमुळे पनवेलच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, ‘लोकशाहीचा बाजार’ भरल्याची चर्चा आता नागरिकांत रंगू लागली आहे.

## कायद्याच्या शिक्षणाला ‘कोर्ट क्राफ्ट’ची जोड

ॲड. गजानन बी. चव्हाण, ॲड. मिलिंद एस. पाटील, ॲड. वंसत डी. साळुंखे, ॲड. मिलिंद एस. थोबडे, ॲड. अविनाश जे. भिडे, ॲड. वसंतराव ई. भोसले, ॲड. अनिल एम. गोवर्दिपे, ॲड. विवेकानंद एन. घाटगे, ॲड. आसिफ एस. कुरेशी, ॲड. अविनाश बी. आव्हाड, ॲड. अमोल एस. सावंत, ॲड. अण्णाराव जी. पाटील, ॲड. सतीश ए. देशमुख, सीनिअर ॲड. सुदीप आर. पासबोला, ॲड. सुभाष जे. घाटगे, ॲड. विठ्ठल बी. कोंडे-देशमुख, ॲड. अहमदखान यू. पठाण, ॲड. राजेंद्र बी. उमाप आणि ॲड. पारिजात एम. पांडे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, बदलते कायदे, नवे फौजदारी कायदे आणि सारख्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणारे प्रशिक्षित वकील व अभियोजक घडविण्यासाठी ही अकॅडमी उपयुक्त ठरेल. राज्य शासनाकडून दहा कोटी रुपयांचे अनुदान अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर देण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली. संशोधनाशिवाय गुणवत्ता येत नाही; त्यामुळे हे केंद्र भविष्यात दर्जेदार कायदेविषयक संशोधनाचे केंद्र बनेल, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात ‘विधी महर्षी पुरस्कार’ न्यायमूर्ती बी. बी. चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. अमरावतीचे दिवाणी वकील ज्ञानेश्वर बावरेकर यांना मरणोत्तर सन्मान देण्यात आला. दरम्यान, यावेळी आपल्या भाषणात माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी वकिलांचे दर्जेदार प्रशिक्षण न्यायप्रक्रियेची गुणवत्ता उंचावेल, असे सांगितले.

**अकॅडमीची वैशिष्ट्ये**

वकिलांसाठी देशातील पहिले समर्पित ट्रेनिंग आणि रिसर्च सेंटर. कायद्याचे शिक्षण + प्रत्यक्ष कोर्ट क्राफ्ट यांचा संगम. नवीन फौजदारी कायदे, डिजिटल कायदे आणि वापरावर प्रशिक्षण. कायदेविषयक दर्जेदार संशोधनाला चालना. राज्य शासनाकडून ० कोटी अनुदान जाहीर. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचा पुढाकार.

## जावयानेच केला खून

आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक स्थापन करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण आणि कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात यश आले.

याप्रकरणी महादेव ऊर्फ शिवा राधाकिसन ढोबळे (२५, रा. जाटदेवळा, ता. पाथडी, जि. अहिल्यानगर) यास आष्टी (जि. बीड) येथून ताब्यात घेण्यात आले. अशोक अजिनाथ भोसले (१९) आणि गणेश उत्तम पंडागळे (२५) यांना जाटदेवळा येथून अटक करण्यात आली. तर शुभम एकनाथ पवार (२३, रा. माणिक दवंडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यास पेण (जि. रायगड) येथून ताब्यात घेण्यात आले.

प्राथमिक तपासात मुख्य आरोपी महादेव ढोबळे हा मयत महिलेचा जावई असल्याचे समोर आले. वृद्ध महिला घरात एकट्या राहात असल्याची माहिती आरोपींना असल्याने त्यांनी घरात प्रवेश करून खून व चोरी केल्याचे उघड झाले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सपोनि भैरु जाधव करीत असून, खून करण्यामागील नेमके कारण आणि चोरीस गेलेले दागिने हस्तगत करण्याबाबत तपास सुरू आहे. अवघ्या ४८ तासांत गंभीर गुन्ह्याचा उलगडा केल्याबद्दल रायगड पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## रोहा येथे एलसीबीची धडक कारवाई

### तीन जनावरे व पिकअपसह ५.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यात गुरांची अवैध वाहतूक व चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी रायगड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत तीन जनावरे आणि पिकअप वाहन असा सुमारे ५ लाख ८० हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

मेढा परिसरात गुरांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती एलसीबीला मिळाली होती. त्यानुसार एलसीबीचे पोलीस कर्मचारी मोरेश्वर ओमले, चालेकर तसेच रोहा पोलीस ठाण्याचे कर्मचारी टेमकर यांनी मेढा विभागात पेट्रोलिंग सुरू केले. २९ जानेवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ११.२५ वाजता पडम गावाच्या हद्दीत संशयास्पद पिकअप वाहन आढळले. पोलिसांनी वाहन अडवून तपासणी केली असता, पिकअप क्रमांक एमएच ०६ बीडब्ल्यू ४२५९ मध्ये निर्दयपणे कोंबलेली जनावरे आढळून आली. तपासात वाहनात दोन म्हशी (प्रत्येकी अंदाजे १.३५ लाख) आणि एक रेडकू (अंदाजे १० हजार) आढळले. तसेच महिंद्रा कंपनीचे पांढऱ्या रंगाचे पिकअप वाहन (अंदाजे ३ लाख) जप्त करण्यात आले. या जनावरांच्या वाहतुकीसाठी कोणतीही वैध परवानगी, खरेदी-विक्रीची कागदपत्रे किंवा पशुसंवर्धन विभागाची मंजुरी नसल्याचे स्पष्ट झाले.

या वाहनाचा चालक प्रसाद गंगाराम कोकळे (२८, रा. शिल्पनगरी, रोहा) याला ताब्यात घेण्यात आले असून, चोरीची जनावरे गोळा करून अवैध विक्रीसाठी वाहतूक केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

याप्रकरणी एलसीबीच्या तक्रारीवरून रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुरांची चोरी, अवैध वाहतूक आणि प्राण्यांवरील क्रूरतेबाबतच्या कलमान्वये पुढील तपास सुरू आहे. या कारवाईबद्दल एलसीबी पथकाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## भीषण अपघातात दुचाकीस्वार ठार

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथे शनिवारी दुपारी पर्यटकांच्या कार आणि दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वाराला कारने सुमारे दीड ते दोन किलोमीटर फरफटत नेल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. करलास (ता. श्रीवर्धन) येथील महंमद हनीफ अरजबेगी आणि त्यांची पत्नी सिमीन अरजबेगी हे दुचाकीवरून जात असताना एमएच-१२ डब्ल्यूएक्स २१८६ स्विफ्ट डिझायर कारने दिवेआगर येथील माऊली रिसॉर्टजवळ धडक दिली. धडकेनंतर कारचालकाने वाहन न थांबवता बोर्ली पंचतनकडे वेगाने पळ काढला. यादरम्यान दुचाकीस्वाराला कारखाली फरफटत नेले. यामध्ये महंमद हनीफ अरजबेगी यांचा जागीच मृत्यू झाला असून, सिमीन अरजबेगी गंभीर जखमी आहेत.

## १० फेब्रुवारीला होणार महापौर, उपमहापौरांची निवड

### ६ फेब्रुवारीला अर्ज भरण्याची मुदत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या रिक्त असलेल्या महापौर आणि उपमहापौर पदांच्या निवडीचा अधिकृत कार्यक्रम प्रशासनाकडून जाहीर करण्यात आला आहे. येत्या मंगळवारी, १० फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले असून, या निवडणुकीत प्रथमच हात उंचावून मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. या प्रक्रियेमुळे निवडीत पूर्णतः पारदर्शकता राहणार असून, संपूर्ण शहराचे लक्ष याकडे लागले आहे.

निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या पालिका सदस्यांना शुक्रवारी, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी आपले नामनिर्देशन पत्र सादर करावे लागेल. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत महापालिका सचिवांच्या दालनात स्वतः उपस्थित राहून विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. मंगळवारी, १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११:०० वाजता निवडीसाठी विशेष सभा सुरू होईल. या प्रक्रियेचे मुख्य टप्पे हे सभेच्या सुरुवातीला अर्जांची कायदेशीर छाननी केली जाईल. पात्र उमेदवारांची नावे घोषित केल्यानंतर १५ मिनिटांचा वेळ उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दिला जाईल, अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया सुरू होईल. पीठासीन अधिकारी उमेदवारांची नावे वर्णानुक्रमाने पुकारतील. यावेळी प्रत्येक उमेदवारासाठी हात उंचावून मतांची नोंद घेतली जाईल. ज्यांनी उमेदवाराच्या बाजूने मत दिले, ज्यांनी विरोधात मत दिले किंवा जे सदस्य तटस्थ राहिले, अशा सर्वांची नोंद कार्यवृत्तात केली जाईल.

# आघाडीच्या सर्व उमेदवारांना निवडून आणा

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे आवाहन





| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यातील २ जिल्हा परिषद आणि ४ पंचायत समितीच्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी म्हसळा तालुक्याचा दौरा केला. त्याचे औचीत्य साधून जयंत पाटील यांनी म्हसळा येथील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या निवडणूक मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन केले.

सध्या राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकींच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. रायगड जिल्ह्यात देखील उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन करण्यात येत आहे. यादरम्यान, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी म्हसळा तालुक्याला भेट दिली. दरम्यान, पाभरे जिल्हा परिषद गटातील शेकाप-महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष पाटील यांच्या प्रचारार्थ गोंडघर येथे जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना जयंत पाटील यांनी सांगितले की, स्व. प्रभाकर पाटील यांच्यापासून म्हसळा तालुक्याशी आमचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. स्व. प्रभाकर पाटील यांनी या तालुक्यात अनेक विकास कामे केली असून अनेक गावांच्या पाण्याच्या योजना त्यांनी राबविल्या आहेत. तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास कामांचा धडाका सुरु असून हा धडाका असाच सुरु राहणार आहे. यापुढेही म्हसळा तालुक्याच्या विकासकामांना निधी कमी पडून देणार नाही, असे आश्वासन जयंत पाटील यांनी दिले. पुढे बोलताना ते म्हणाले की, ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची आहे. शेतकरी कामगार पक्ष सत्तेत नसला तरी तो नेहमी सत्याच्या आणि सामान्य जनतेच्या पाठीशी उभा राहिला आहे. गोरगरीब, कष्टकरी, मजूर, शेतकरी यांच्याशी शेकापची वैचारिक व लढाऊ बांधिलकी कायम आहे. त्यानंतर एमआयडीसी संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, आमचा एमआयडीसीला विरोध नाही. मात्र, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे, स्थानिक युवकांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत आणि शेतकऱ्यांचे समाधान झाले पाहिजे. या अटी मान्य असतील तरच आम्ही जागा देऊ; अन्यथा संघर्ष करायला आम्ही मागे पुढे पाहणार नाही, असा इशारा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्याकडून देण्यात आला आहे. तसेच, मतदारांनी विरोधकांच्या अमिषाला बळी न पडता महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून आणण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. या सभेमुळे पाभरे गटासह तालुक्यातील २ जिल्हा परिषद आणि ४ पंचायत समितीच्या महाविकास आघाडीच्या प्रचाराला चांगलाच जोर आला असून, जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी म्हसळा तालुका दौऱ्याचे औचीत्य साधून म्हसळा येथील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या निवडणूक मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन केले. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) उपजिल्हा प्रमुख नंदू शिर्के, जिल्हा परिषदेचे उमेदवार संतोष पाटील, रोशन पारवे, पंचायत समितीचे उमेदवार कृष्णा म्हात्रे, चैतन्या गजमल, रमेश खोत व ज्योती गिजे यांच्यासह माजी चिटणीस परशुराम मांदाडकर, राजाराम धुमाळ, राजाराम तिलटकर, दीपल शिर्के, कौस्तुभ करडे, सचिन गिजे, हेमंत नाक्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

### विरोधकांवर टीका

सभेत उपस्थितांना संबोधित करताना शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी जमिनींच्या खरेदी-विक्रीवरून विरोधकांवर टिका केली आहे. ते म्हणाले की, धनदांडग्यांनी जमिनी घेऊन शासनाच्या मदतीने त्या पाचपटीने विकण्याचा खेळ त्यांनी चालू केला आहे, तो आता चालू देणार नाही. आमचं राजकारण बैलजोडीचं हाय, हळूहळू पण सरळ रस्त्यानं जातं. आणि काहींचं राजकारण उधार बैलासारखं; मालक बदलला की वाट बदलतं! आमच्या नादी लागू नका; नादी लागलात तर गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही जयंत पाटिल यांनी दिला आहे.

## आंबेपूरमध्ये शेकाप-महाविकास आघाडीचा झंझावात











● जिल्हा परिषद आंबेपूर गटाच्या उमेदवार अॅड. पूजा भगत-गिरी, आंबेपूर पंचायत समिती गणाचे उमेदवार धनंजय म्हात्रे व रुईशेत भोमोली पंचायत समिती गणाचे उमेदवार रूपेश उघडा यांच्या प्रचारार्थ शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यासह शेकाप व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा झंझावात दिसून आला.



● चौल येथील मुख्य मुखरी गणपती मंदिरात महाविकास आघाडीच्या प्रचाराचा नारळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.











● शेतकरी कामगार पक्षाचे चेंढरे जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार प्रवीणा घासे आणि पंचायत समिती गणाचे उमेदवार प्रफुल्ल पाटील यांचा प्रचार शनिवारी (दि.३१) ढवर येथील मारुती मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला.यावेळी शेकाप महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, ढवरचे माजी सरपंच, सदस्य, ग्रामस्थ, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रचाराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. (छायाचित्र : अमोल नाईक)

## जासईत मविआतर्फे प्रचाराचा धडाका



| चिरनेर | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. यावेळी जासई जिल्हा परिषद गटाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. मनीष पाटील व चिर्ले पंचायत समिती गणातील महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रियांका मढवी यांचा गणातील गावांसह आदिवासी वाड्या व परिसरात प्रचाराचा झंझावात सुरू आहे. दोन्ही उमेदवार व कार्यकर्ते घरोघरी जाऊन प्रचार पत्रकाचे वाटप करत आहेत. यादरम्यान, प्रत्येक गावागावात उमेदवारांचे जल्लोषात स्वागत होत आहे.

फेब्रुवारी २००७ मध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत जासई मतदारसंघातून डॉ. मनिष पाटील यांनी रस्ते, पाणीपुरवठा, मूलभूत सुविधा यांवर भर देऊन, मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली आहेत. आजही त्यांच्या विकासाचा धडाका सुरू आहे. मतदार संघातील मतदार हे जागृत मतदार आहेत. दरम्यान, जासई जिल्हा परिषद गटात व चिर्ले पंचायत समिती गणात महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी प्रचारात निर्णायक आघाडी घेतली आहे. तालुक्यातील विंधणे, वेश्वीसह अनेक गावांमध्ये दोन्ही उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात झाली. यावेळी त्यांनी गावातील प्रत्येक मंदिरात जाऊन प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी उमेदवारांनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी नागरिकांबरोबर संवाद साधून, हाताचा पंजा व खटारा चिन्हा समोरील बटन दाबून निवडून देण्याचे आवाहन केले. प्रचारात महिला, तरुण मंडळी, जेष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते.

यावेळी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रामनाथ पंडित, ज्येष्ठ नेते के.बी. पाटील, माजी सरपंच नामदेव पाटील, स्वाती मुंबईकर, सुरेश कडू, जासई विभाग अध्यक्ष विनोद पाटील, प्रकाश मुंबईकर, जगदीश पाटील, रवींद्र पाटील, परेश पाटील, शरद पालकर, महेंद्र मुंबईकर, अरविंद पाटील, राम पालकर, गोपाळ पाटील, अच्युत कडू, विकास पाटील, सुरेश डाकी, दिघोडेचे माजी सरपंच अविनाश पाटील, यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



● कुरुळ गावात चेंढरे जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार प्रविणा घासे व चेंढरे पंचायत समिती गणाच्या उमेदवार प्रिया ढवळे यांच्या प्रचारार्थ शेकापसह महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून आला.

## रायवाडीत शेकापची प्रचारात आघाडी









| अलिबाग | शहर प्रतिनिधी |

चेंढरे जिल्हा परिषद मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीने प्रचारात आघाडी घेतली असून, आक्षी ग्रामपंचायत परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी मतदार जनतेने शेकाप-महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरेघोस मतांनी निवडूण आणण्याचा निर्धार केला आहे.

रायगड जिल्ह्यात शेकाप-महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचाराचा मोठा झंझावात सुरू आहे. दरम्यान, चेंढरे जिल्हा परिषदेचे उमेदवार प्रविणा घासे आणि आक्षी पंचायत समितीचे उमेदवार प्रफुल्ल पाटील यांनी अलिबाग तालुक्यातील आक्षी व साखर परिसरात शुक्रवारी (दि.३०) दिवसभर प्रचार केला. आक्षी गावात शेकापने मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत. 'शेकाप नाही तर विकास नाही', अशी परिस्थिती सध्या आक्षी गावाची आहे. त्याची जाणिव दोन्ही उमेदवारांनी येथील जनतेला करून दिली. तसेच, त्यांचे प्रश्न व मागण्या ऐकून त्यावर १०० टक्के तोडगा काढून ते पुर्णत्वास नेण्याचे आश्वासन शेकाप-महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी दिला. त्यानंतर शनिवारी (दि.३१) रायवाडी येथील पांडबादेवी मंदिरात देवीचे आशिर्वाद घेऊन प्रचाराला सुरूवात केली. यावेळी देखील रायवाडीतील जनतेमधून उमेदवार प्रविणा घासे आणि प्रफुल्ल पाटिल यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. प्रचारादरम्यान उमेदवारांना प्रचंड प्रतिसाद देखील मिळाला. यावेळी आक्षी ग्रामपंचायत हद्दीतील मतदार जनतेने शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मताने निवडून देण्याचा निर्धार केला आहे.

यावेळी उमेदवार प्रविणा घासे, प्रफुल्ल पाटील यांच्यासह शेकाप ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, आक्षी सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, सदस्य रश्मी वाळंज, निरजा नाईक, विनायक पाटील, माजी सरपंच नंदकुमार वाळंज, माजी जि.प. सदस्या आश्लेशा नाईक, शेकाप कार्यकर्ते विलास राणे, रमण पाटील, उल्हास भाटे, शेषनाथ बानकर, कुमार बानकर, अभिजीत वाळंज, संतोष राऊळ, नितिन सारंग, प्रियंका वाळंज, रंजना बानकर यांच्यासह आक्षी ग्रामपंचाय व चेंढरे जिल्हा परिषद गटातील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# नियोजित शहराचे विदारक वास्तव

## सिमेंटच्या रस्त्यांवर पालिकेचा हातोडा; प्रशासकीय समन्वयाचा बोजवारा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

स्वतःला देशातील अत्याधुनिक आणि नियोजित शहर म्हणवून घेणाऱ्या नवी मुंबईच्या प्रतिमेला पालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे तडा जात आहे. अवघ्या दोन-तीन वर्षांपूर्वी करोडो रुपये खर्चून बनवलेले सिमेंटचे रस्ते आता पुन्हा खोदण्याची तयारी पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने केली आहे. प्रशासकीय विभागांमधील समन्वयाच्या अभावामुळे राष्ट्रीय संपत्तीचा हा अपव्यय म्हणजे सामान्य करदात्यांच्या पैशांची क्रूर थट्टा असल्याची टीका नवी मुंबईच्या सजग नागरिक मंचाने केली आहे.



नवी मुंबईतील आयुक्त कार्यालयासमोरील रस्त्यावर अलीकडेच पाणी पुरवठा विभागाने रस्ते खोदून जलवाहिनी टाकण्याचे काम केले होते. आता हेच काम दारावे प्रवेशद्वारापासून अंतर्गत भागात पुढे न्यायचे आहे. विशेष म्हणजे, या भागातील रस्ते अवघ्या २-३ वर्षांपूर्वीच सिमेंटचे करण्यात आले होते. सिमेंटचा रस्ता तोडणे हे तांत्रिकदृष्ट्या खर्चिक आणि रस्त्याच्या आयुर्मानावर घाला घालणारे असतानाही, पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने हा रस्ता खोदण्याचे नियोजन केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

जगातील प्रगत शहरांमध्ये रस्ते खोदण्याची वेळ येऊ नये म्हणून युटिलिटी डक्टची (विविध वाहिन्यांसाठीची भूमिगत व्यवस्था) सोय असते. नवी मुंबईत मात्र आजवरच्या आयुक्तांनी, महापौरांनी आणि सर्वपक्षीय नेत्यांनी या मूलभूत सुविधेकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येत आहे. शहरात रस्ता बांधतानाच भविष्यकालीन नियोजनाचा भाग म्हणून युटिलिटी डक्ट असणे अनिवार्य आहे. मात्र, नवी मुंबईत रस्ते बांधताना शहर अभियंता विभाग, जलवाहिन्या टाकताना पाणी पुरवठा विभाग आणि सुशोभीकरण करताना उद्यान विभाग यांच्यात कोणत्याही प्रकारचे समन्वय नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी शहर अभियंता विभाग, पाणी पुरवठा विभाग आणि उद्यान विभाग यांच्यात समन्वय साधणारी एक संयुक्त कृती यंत्रणा विकसित करणे आवश्यक आहे. रस्ते तयार करण्यापूर्वीच इतर विभागांना लागणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतल्यास सिमेंटचे रस्ते तोडण्याची वेळ येणार नाही.

माजी शहर अभियंत्यांनी यापूर्वी सजग नागरिक मंचाला लेखी आश्वासन दिले होते की, यापुढे प्रत्येक रस्त्याच्या निवेदेत युटिलिटी डक्टची अट टाकली जाईल. मात्र, या आश्वासनाचा प्रशासनाला विसर पडला आहे. वारंवार रस्ते खोदणे आणि ते बुजवण्यासाठी पुन्हा नव्याने निविदा काढणे यात अधिकारी आणि कंत्राटदारांचे आर्थिक हितसंबंध दडलेले असल्याचा आरोप सजग नागरी मंचाने केला आहे. केवळ प्रशासकीय असंवेदनशीलतेमुळे सिमेंटचे रस्ते तोडून राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान केले जात आहे. या कारणास्तव पालिका आयुक्त आणि संबंधित शहर अभियंत्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा सजग नागरी मंचाने दिला आहे.

> “एकीकडे शहर विकासाच्या बाता मारायच्या आणि दुसरीकडे करोडोंचे रस्ते तोडून जनतेच्या पैशांची नासाडी करायची, हा प्रकार संतापजनक आहे. जर प्रशासनाने शहर अभियंता, पाणी पुरवठा आणि उद्यान विभाग यांच्यात समन्वय असणारी यंत्रणा तातडीने कार्यान्वित केली नाही, तर पालिकेच्या या कार्यपद्धती विरोधात न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतील
> – सजग नागरिक मंच, नवी मुंबई”

## मृत्यूच्या दाढेतून प्रवाशाला काढले सुखरूप बाहेर

**। पनवेल । प्रतिनिधी।**

रेल्वे स्थानकावर एका प्रवाशासाठी रेल्वे कर्मचारी देवदूत ठरले आहेत. चालत्या गाडीत चढण्याच्या प्रयत्नात तोल जाऊन प्लॅटफॉर्म आणि गाडीच्या फटीत पडलेल्या प्रवाशाला रेल्वे कर्मचाऱ्यांनी अत्यंत धाडसाने आणि तत्परतेने मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर काढून त्याचे प्राण वाचवले आहेत. या थरारक घटनेमुळे स्थानकावर काही काळ प्रवाशांच्या हृदयाचे ठोके चुकण्याची वेळ आली होती; परंतु, येथील रेल्वे कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे या प्रवाशाचे प्राण वाचताच प्रवाशांनी या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

दादर-तिरुनेलवेली एक्स्प्रेस पनवेल स्थानकावर थांबली होती. गाडी सुटत असताना एका प्रवाशाने घाईघाईने जनरल डब्यात चढण्याचा प्रयत्न केला. मात्र, अचानक पाय घसरल्याने त्याचा तोल गेला आणि तो थेट प्लॅटफॉर्म व धावत्या रेल्वेमधील अरुंद फटीत अडकला. हा प्रकार पाहताच आसपासच्या प्रवाशांनी मोठ्याने ओरडण्यास सुरुवात केली. हा आवाज ऐकून कोकण रेल्वेचे फिरते तिकिट निरीक्षक महेश कांबळे यांनी क्षणाचाही विलंब न लावता ऑन ड्युटी गार्डना गाडी थांबवण्याचा इशारा दिला. त्यानंतर गार्ड यांच्यासह महेश कांबळे आणि घेतली. जीवाची बाजी लावून त्यांनी अजित परब यांनी घटनास्थळी धाव फटीत अडकलेल्या प्रवाशाला सुरक्षितपणे बाहेर काढले. सुदैवाने या घटनेत या प्रवाशाला गंभीर नाही. दरम्यान, रेल्वे सुरक्षा दलाच्या और दुखापत झाली जवानांनी तातडीने मदतीचा हात देत या प्रवाशाला प्लॅटफॉर्मवर आणल्यानंतर त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना पुढील तपासणीसाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रवाशांनी धावत्या गाडीत चढण्याचा किंवा उतरण्याचा प्रयत्न करू नये. आपले आयुष्य मौल्यवान आहे, त्यामुळे रेल्वे प्रवेश करावा, असे आवाहन पूर्ण चांबल्यानंतरच डब्यात कोकण रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुनील बी. नारकर यांनी केले आहे.

## उंबरखिंडीत विजयदिन सोहळ्याचे आयोजन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

ग्रामपंचायत चावणी ग्रामस्थ, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती खालापूर व शिवदुर्ग मित्र मंडळ यांच्यावतीने समरभूमी उंबरखिंड-चावणी येथे ३६५व्या विजय दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा विजय दिन सोहळा सोमवारी (दि.२) सकाळी ९:३० वाजता चावणी येथे आयोजित करण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी २ फेब्रुवारी १६६१ गनिमी काव्याचा वापर करत मोजक्या मावळ्यांना घेऊन करतालब खानाच्या मुघल सैन्याचा दारुण पराभव केला होता. त्यांच्या या इतिहासाचे स्मरण व्हावे आणि त्यांच्या कार्याला उजाळा मिळावा यासाठी दरवर्षी समरभूमी उंबरखिंड येथे विजय दिन सोहळा आयोजित करण्यात येतो. त्याच प्रमाणे यावर्षीही सकाळी विजय स्तंभाला अभिवादन करून मराठमोळा पोवाडा आणि प्रबोधनकार शिवशाहीर वैभव घरत यांचा ‘आम्ही मराठी’ शाहिरी कार्यक्रम होणार आहे. तर, शिवव्याख्याते ॲड. विनय चंद्रकांत दाभाडे यांचे शिवव्याख्यान होणार आहे.

## पोलिसांच्या तत्परतेमुळे अपघात टळले

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तळोजा येथे एका कार्यक्रमानिमित्त येणार असल्याने ते जाणाऱ्या मार्गावर पोलीस बंदोबस्त ठिकठिकाणी लावण्यात आला होता. पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गव्हाण फाटा येथील वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे, गोपनीय विभागाचे मनोज पाटील, पोलीस हवालदार माधव शेवाळे, चालक समाधान पाटील हे कर्तव्यावर असताना एका मच्छी वाहून नेणाऱ्या टेम्पोमधून मोठ्या प्रमाणात थर्माकोलचे बॉक्स भर रस्त्यात पडले. त्यावेळी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ सुरु होती. हा प्रकार नितीन ठाकरे यांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने त्यांच्या सोबत असलेल्या पथकाच्या साहाय्याने महामार्गावर धाव घेऊन रस्त्यावर पडलेले थर्माकोलचे मोठे बॉक्स त्वरित बाजूला केले. त्यामुळे होणारे अपघात टळले. पोलिसांच्या तत्परतेबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.



## मुरूडमध्ये मुक्ती संग्राम दिन उत्साहात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटीश राजवटीतून स्वतंत्र झाला. तथापि काश्मिर, जुनागड, हैदराबाद आणि जंजिरा संस्थान सारख्या संस्थानिकांनी सामिल नाम्यावर स्वाक्षरी करताना खूप वेळ घेतला होता. त्यामुळे मुरुड, श्रीवर्धन व म्हसळा या तीन तालुक्यांना ३१ जानेवारी १९४८ रोजी खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले. जंजिऱ्याच्या नवाबाने तत्कालीन मुख्यमंत्री बा.ग. खैर यांची मुंबई येथे भेट घेऊन शामिल नाम्यावर सही केली. तेव्हापासून हे तीन तालुके भारतात समाविष्ट झाले होते. त्यामुळे ३१ जानेवारी हा दिवस जंजिरा संस्थान मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा करण्यात येतो.



यावेळी मुरुड तालुका पत्रकार संघ व रायगड प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जंजिरा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. आझाद चौकात मुरुड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मुरुड तहसीलदार आदेश डफळ, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, उपनगराध्यक्ष वीरेन भगत, फादर बोनाव्हेंचर नुनीस, माजी तहसीलदार नयन कर्णिक, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, नगरसेविका प्रांजली मकू, नगरसेवक आदेश दांडेकर, प्रमोद भायदे, नगरसेवक पांडुरंग आरेकर, श्रीकांत खोत, डॉ. राज कल्याणी, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, वासंती उमरोटकर, प्रकाश राजपुरकर, मुरुड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिराज शेख, भारत रांजणकर आदींसह सरएसए हायस्कूल व ओंकार विद्या मंदीर उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## साई मंदिराचा वर्धापनदिन सोहळा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी येथील एच.ओ.सी. श्री साई मंदिराचा भक्तिमय उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बुधवार श्री साई महिला मंडळ रसायनीच्यावतीने ललिता सहस्त्रणाम व महिलांसाठी हळदी कुंकूच्या कार्यक्रमाने पहिले पुष्प साधारण १ हजार महिला भगिनींच्या साक्षीने गुंफण्यात आले. गुरुवारी मंडळाचे पुजारी श्रीमान दास यांच्या पौराहित्य खाली दुसरे पुष्प श्री गणेश जयंती निमित्त विणण्यात आले. त्यामध्ये श्री वास्तुशांती यज्ञ, श्री गणेश पूजन, नवग्रहपूजन, मातृका पूजन, ब्रह्म सावित्री पूजन, श्री गायत्री हवन मान्यवर विश्वस्ताच्या श्री साई सत्संग केंद्राच्यावतीने संपन्न झाले. संध्याकाळी साई भक्ताच्यावतीने श्री साई बाबा पालखी सोहळा हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. यामध्ये जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ तुराडे, श्री हनुमान प्रासादिक मंडळ नवघर, श्री आंबेसृती भजन मंडळ नवीन पोसरी, श्री सोंडाई भजनमंडळ वावर्ले आणि वैश्यवाणी भजनमंडळ चौक यांच्यावतीने पालखी सोहळ्यात रंगत आणली. पालखी सोहळाचे संपूर्ण नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष जयवंत अंबवणे व अध्यक्ष एम. एस. मगर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.



## खारघरमधील व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** खारघर वसाहत सेक्टर १२ येथून एक व्यक्ती हरवल्याची तक्रार खारघर पोलिसांकडे दाखल करण्यात आली आहे. या व्यक्तीचे नाव सुरेशसिंग चैतसिंग राणा (४१) असे असून ते अंगाने मध्यम, रंगाने काळे, उंची ५.२ फुट, केस काळे, नाक सरळ, अंगात हॉटेलचा ड्रेस ब्राउन शर्ट, ब्राऊन रंगाची पॅन्ट, पायात पांढऱ्या रंगाचे शुज घातलेले असून त्यांना हिंदी गडवाली भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार नितीन आखाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## सुभाष राठोड राज्यात अव्वल

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागा तर्फे राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे कडून आत्मचरित्र लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा पालघर जिल्ह्यातील वसई येथील थॉमस बापिस्ता डी. एल.एड्. कॉलेज या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत राज्यातील ३६ जिल्ह्यांतून ८ विभागातील ४० लोकांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली होती. या स्पर्धेत मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाच जणांची निवड करण्यात आली. त्यात रसायनी-पाताळगंगा येथील सुभाष राठोड हे एक शिक्षक होते. ते राज्यातून सर्वात अव्वल ठरले. त्यांच्या यशाचे कौतुक शाळा व केंद्रातून करण्यात आले. केंद्रप्रमुख जे.पी. परदेशी यांनी शाळेत येऊन त्यांचा सत्कार केला. तसेच, विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सुद्धा त्यांचा सन्मान केला.

### कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलचे बँड प्रदर्शन | उपस्थित मान्यवरांसह प्रेक्षकांकडून कौतुक

## स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांचे संचलन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील जिल्हा पोलीस परेड मैदानावर सोमवारी (दि.२६) प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खोपोली येथील कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलमधील स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट बँड संचलन व बँड प्रदर्शन सादर करून उपस्थित मान्यवरांचे व प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.



गतवर्षी लखनऊ येथे झालेल्या १९ व्या राष्ट्रीय जांबोरीमध्ये कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलच्या स्काऊट-गाईड बँड पथकाने दि.२३ ते २९ नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना बँड संचलनाद्वारे मानवंदना दिली होती. तसेच, राष्ट्रीय बँड स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत ‘अ श्रेणी’ प्राप्त केल्याबद्दल या बँड पथकास रायगड जिल्हा मुख्य संचलन कार्यक्रमात राष्ट्रध्वज व मान्यवरांना मानवंदना देण्यासाठी आणि बँड प्रदर्शन सादर करण्यासाठी विशेष निमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी राष्ट्रीय जांबोरीतील उल्लेखनीय यशाबद्दल स्काऊट-गाईड विद्यार्थी, शिक्षक व शाळेचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विविध संचलन पथकांसोबत स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध संचलन व आकर्षक बँड डिस्प्लेमुळे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले. या राष्ट्रीय जांबोरीमध्ये रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शाळेतील एकूण २५ स्काऊट-गाईड विद्यार्थी व ३ शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

या यशामागे रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग, रायगड भारत स्काऊट-गाईड जिल्हा संस्था, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा जिल्हा मुख्य आयुक्त स्काऊट-गाईड ललिता दहितुळे, उपशिक्षणाधिकारी तथा जिल्हा आयुक्त स्काऊट सुनील भोपळे, उपशिक्षणाधिकारी तथा जिल्हा सेक्रेटरी स्काऊट-गाईड संतोष शेडगे, जिल्हा संघटक गाईड सोनाली, शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया, व्यवस्थापक सिस्टर ज्युली मारिया, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गायकवाड व डफळ, जिल्हा कार्यालयीन पूनम व दाते, बँड मास्टर राजेश यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या संचलनात सहभागी स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांसह रायगड जिल्हा संघ प्रमुख तथा स्काऊट मास्टर संदीप साळुंखे, स्काऊट मास्टर समीर शिंदे व गाईड कॅप्टन सरिता बडकूल यांनी विशेष योगदान दिले.

कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलच्या स्काऊट-गाईड पथकाने शिस्त, देशभक्ती व सांघिक कौशल्याचे उत्कृष्ट दर्शन घडवत रायगड जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## निवडक



### आध्यात्मिक सप्ताहाचा समारोप

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील धेरंड येथे दि.२३ ते २७ जानेवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रँथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायनाचे आयोजन येथील दत्त मंदिर घटनाचे तळे येथे ग्रामस्थ मंडळ धेरंड, मोठे शहापूर व धाकटे शहापूर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. या पाच दिवशीय सप्ताहात सुप्रसिद्ध प्रवचनकार, कीर्तन कार यांचा समावेश होता. तसेच, या ठिकाणी काल्याची कीर्तन सेवा गोविंद शेलार यांची ठेवण्यात आली होती. आपण भगवंताच्या सानिध्यात राहून परमात्म्याची प्राप्ती करू शकतो. कलियुगात भजन, प्रवचन, कीर्तन याला महत्त्व दिले तर आपण सर्व व्याधीतून मुक्त होऊन आत्मिक सुखाची प्राप्ती सहजपणे मिळू शकते, असे बोधपर विचार आपल्या कीर्तन रुपी सेवेतून उपस्थित भाविक भक्तांना सांगितले. या सप्ताहातील श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायणाची समाप्ती ॲड. कुंदन पाटील यांनी संपत्नीक केली.



### नेरळमध्ये रस्ता सुरक्षा अभियान

**नेरळ :** वाहतूक सप्ताहाच्या निमित्ताने नेरळमध्ये वाहतूक सुरक्षा अभियान सुरु आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्याची वाहतूक शाखा जोरदारपणे हे अभियान राबवत असून वाहनचालक यांना शिस्तीचे धडे देण्यासाठी वाहतूक शाखेचे पोलिसांकडून अनेक उपक्रम राबविले जात आहेत. रायगड जिल्हा पोलीस व वाहतूक शाखेच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहेत. यामध्ये नेरळ पोलीस ठाण्याच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान राबविले जात आहे. नेरळ वाहतूक पोलीस नितीन अहिरे यांनी वाहन चालकांपर्यंत पोहचून वाहतुकीचे नियम पाळा, सुरक्षित रहा, सुरक्षित वाहन चालवा यासाठी जनजागृती केली. यावेळी नागरिकांमध्ये व वाहन चालकांमध्ये वाहतुकीच्या नियमांची व चिन्हांची जनजागृती केली जात आहे. तसेच, रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वाहनांवर रिफ्लेक्टर लावण्यात येत आहेत. त्याचबरोबर वाहतुकीचे नियमही सर्वांपर्यंत पोहोचवले जात आहेत. दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करावा, वेग मर्यादेपेक्षा अति वेगाने वाहन चालू नये, मद्य प्राशन करून वाहन चालू नये, वाहन चालविताना लेन कटिंग करू नये, पादचाऱ्यांनी नेहमी फूटपाथचा वापर करावा, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करू नये, रस्त्यावर धोकादायक रित्या वाहन चालू नये, पादचाऱ्यांनी झेब्रा क्रॉसिंग च्या ठिकाणी रस्ता ओलांडावा, वाहन चालविताना पादचाऱ्यांना प्राधान्य द्यावा, असे आवाहन केले जात आहे.



### टाऊनशिप प्रोजक्टसाठी चॅनेल पार्टनर्सची मोठी उपस्थिती

**पनवेल :** जे प्राईम बिल्डकॉन यांच्या आगामी जे प्राईम स्वास्तिक या भव्य टाउनशिप प्रोजेक्टसाठी चॅनेल पार्टनर्स मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा मेळावा वाशी येथील आयलीफ ग्रँड बँकवेट्स येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला नवी मुंबई व मुंबई परिसरातील नामवंत व ६०० पेक्षा अधिक प्रख्यात चॅनेल पार्टनर्स यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. या कार्यक्रमाला अभिनेत्री उर्मिला कानेटकर यांनी विशेष उपस्थिती लावली. कलाकार ओम यादव यांनी आपल्या प्रभावी आवाजातील संगीतांमुळे कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली. आंतरराष्ट्रीय बिझनेस कोच दिलीप औटी यांनी चॅनेल पार्टनर्ससाठी विशेष मोटिव्हेशनल सेशन घेतले. त्यांनी नियोजनबद्ध कामकाज, व्यवसायातील अडचणींवर मात करून सक्षम उद्योगनिर्मिती कशी करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. जे प्राईम बिल्डकॉनचे मॅनेजिंग डायरेक्टर अविनाश जगदाळे यांनी उपस्थित चॅनेल पार्टनर्सचे स्वागत करत संस्थेच्या वाटचालीची माहिती दिली.



### आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मानवतावादी संकल्प

**उरण :** समाजातील सर्वात वंचित घटक असलेल्या आदिवासी पाड्यांवरील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खाऊवाटप करण्यात आले. विंधणे आदिवासी वाडी, पिरवाडी आदिवासी वाडी, कोप्रोली आदिवासी वाडी येथील शाळांमधील लहानग्यांच्या चेहऱ्यावर खुललेले आनंदी हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. हा केवळ खाऊवाटपाचा कार्यक्रम नव्हता, तर ‘तुम्ही एकटे नाही’ हा विश्वास देणारा भावनिक आधार होता. दिव्यांग व्यक्तींनी स्वतःच्या अडचणींवर मात करत समाजासाठी उभे राहण्याचा घेतलेला हा निर्धार खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे. आई फाऊंडेशन ही संस्था दिव्यांग बांधव तसेच आदिवासी व वंचित घटकांच्या उत्कर्षासाठी मार्गदर्शन, सहकार्य आणि सामाजिक भान जागृत करण्याचे सातत्याने कार्य करत आहे. संस्थेने यापूर्वीही पूरग्रस्तांना मदत, उरणमधील गरजू दिव्यांगांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, दिव्यांग बांधवांना वेळोवेळी मार्गदर्शन असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मदन पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, रणिता ठाकूर, महेश पाटील, उमेश पाटील, संदेश राजगुरू, योगेश पाटील, नितीन सांगवीकर, राकेश पाटील यांनी अथक परिश्रम घेतले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१ फेब्रुवारी**

१) श्रीम.तारामती हरिश्चंद्र पाटील मु.कुरूळ, अलिबाग, दि.१-२-१९३७

२)श्री.शौकत इब्राहीम पठाण चेंढरे, ता.अलिबाग दि.१-२-१९४७

३)श्री.रमेश पांडुरंग कंटक मु.बेलकडे, अलिबाग दि.१-२-१९५१

४)श्री.प्रभाकर हरी तांडेल श्रीबाग-२, अलिबाग दि.१-२-१९४६

५)लीलाबाई पारसमल जैन बाजारपेठ, अलिबाग दि.१-२-१९५०

६)श्री.नारायण वामन म्हात्रे मु.नागाव, अलिबाग दि.१-२-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**स्व. वामन दामोदर पाटील, स्मरणार्थ विद्यानगर अलिबाग**

# श्रीवर्धनमध्ये काजू मोहर बहरला

## • तालुक्यातील उष्ण व दमट हवामान पोषक ; हंगामात पंधराशे मेट्रिक टन उत्पादन अपेक्षित

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात काजू पिकास अनुकूल वातावरण असल्याने बागायतदारांकडून वेंगुर्ला चार व वेंगुर्ला सात या जातीची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे. तालुक्यात ६४५.०० हेक्टर क्षेत्रात काजू लागवड असून या हंगामात अंदाजे पंधराशे मेट्रिक टन उत्पादन अपेक्षित आहे.




काजू झाडांची चांगली निगा राखल्यास काजूच्या झाडांना लागवडीनंतर तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षात उत्पादन मिळण्यास सुरुवात होते.काजूच्या झाडाला नोव्हेंबर महिन्यात मोहोर येण्यास सुरुवात होते. मोहोर आल्यानंतर फळ तयार होण्यासाठी पासष्ट ते सत्तर दिवसांचा कालावधी लागतो. सर्वसाधारपणे मोहोर दोन ते तीन वेळा येतो. यापैकी जास्त फळे दुसऱ्या वेळी म्हणजे डिसेंबर, जानेवारी महिन्यांत आलेल्या मोहोराला येतात म्हणून या काळात उत्पादनात वाढ करण्यासाठी काजूच्या मोहोराची निगा राखणे अत्यंत आवश्यक असते. लवकर येणाऱ्या मोहोरापासून तयार होणारी फळे ६० दिवसांत काढणीसाठी योग्य होतात तर उशिरा आलेल्या मोहोरापासून तयार होणारी फळे ४५ दिवसांत तयार होतात.

> काजू पिकाच्या लागवडीसाठी फळबाग लागवड योजनेअंतर्गत अनुदान आहे. तसेच काजू फळ प्रक्रियेसाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत अनुदान आहे.बागायतदारांनी योजनांचा लाभ घ्यावा.
>
> – श्रध्दा किरण डुंबरे श्रीवर्धन तालुका कृषी अधिकारी.

**काजूच्या फळापासून विविध उत्पादने घेतली जातात. जॅम, जेली, तसेच मसाल्याचे आणि चविष्ट खाद्यपदार्थ बनवले जातात. काजू प्रक्रिया व्यवसाय हा एक फायदेशीर उद्योग मानला जातो. स्थानिक तरुणांनी या व्यवसायात गुंतवणूक करावी. काजू आधारित स्नॅक्स, काजूचे पीठ व इतर उत्पादने तयार करून व्यवसाय करता येऊ शकतो. काजूच्या टरफलापासून तेल काढले जाते. या तेलाचा उपयोग विविध उद्योगांमध्ये होतो. शाई, रबर व रासायनिक उत्पादनासाठी वापर होऊ शकतो. श्रीवर्धन तालुक्यात काजूचे चांगले उत्पादन होत असून देखील बागायतदार व तरुण उद्योजक या व्यवसायापासून अलिप्त राहिले आहेत.**

तालुक्यातील उत्तम निचऱ्याची जमीन, थोड्याफार प्रमाणात आम्लयुक्त जमीन तसेच डोंगर उतारावरील तांबडी मातीच्या जमिनी या काजू पिकासाठी योग्य आहेत. वरकस जमिनीत काजूचे झाड चांगले पोसले जाते. तालुक्यातील उष्ण व दमट हवामान काजूसाठी अनुकूल असून या हंगामात वेळेत मोहोर आल्याने बागायतदार समाधान व्यक्त करत आहेत. बागायतदार तयार काजू फळ मुंबई, पुणे शहरांतील घाऊक व्यापाऱ्यांना तसेच स्थानिक बाजारपेठेत पाठवत असून ओले काजूगर व सुके काजूगरांना बाजारात चांगली मागणी असते.

## राजन वाघमारे यांचे निधन



**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील घसवड गावचे राजन लक्ष्मण वाघमारे यांचे बुधवारी (दि.२८) निधन झाले त्यावेळी त्यांचे वय ६१ वर्षे होते. ते रायगड जिल्हा परिषद अलिबाग रायगड प्राथमिक शिक्षण खाते, माध्यमिक शिक्षण खाते, महिला बालकल्याण विभाग, डीआरडी कार्यालय अलिबागमध्ये ३४ वर्षे सेवा केली. त्यांच्या पार्थिवावर घसवडच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, नातवंडे, सुना असा मोठा परिवार आहे त्यांचे उत्तरकार्य दहावा शुक्रवार (दि.६ ) फेब्रुवारी तर तेरावे (दि.९ ) सोमवार रोजी राहत्या घरी होणार आहे.



## मतदान जनजागृतीसाठी बाईक रॅली

**। उरण । प्रतिनिधी ।**

स्वीप कार्यक्रमांतर्गत उरण तालुका निवडणूक अधिकारी आविशकुमार सोनोने व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार उद्धव कदम व स्वीप पथक प्रमुख निर्मला घरत यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध गावांमध्ये मतदान जनजागृती सुरू आहे. शनिवार (दि. ३१) रोजी नवीन शेवेतून सर्व शिक्षकांची मतदान जनजागृतीसाठी नवीन शेवे ते दिघोडेपर्यंत ही जनजागृती बाईक रॅली काढण्यात आली.

रॅलीचा शुभारंभ निवडणूक निर्णय अधिकारी आविश कुमार सोनोने, तहसीलदार डॉ. उद्धव कदम व निर्मला घरत यांच्या उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमात तालुक्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनी यांना 'मी मतदान करणारच' नावाची टी-शर्ट देऊन हातामध्ये विविध मतदान जनजागृती बॅनर घेऊन रॅली काढण्यात आली. यावेळी मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, मी मतदान करणारच, चला मतदान केंद्रावर जाऊ या मतदानाचा हक्क बजाऊ या, घोषणा देण्यात आल्या.

## जलजीवन मिशनच्या पाईपलाईनला गळती

### निकृष्ट दर्जाच्या कामामुळे हजारो लीटर पाणी वाया

**। उरण । प्रतिनिधी ।**

प्रत्येक गावात, प्रत्येक घरात पिण्याचे पाणी पोहचावे यासाठी शासनाने सुरू केलेल्या जल जीवन मिशनच्या कामाला उरण तालुक्यात गळती लागली आहे. कोट्यावदीच्या या योजनेत लाखोंचा भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या आहेत. उरण तालुक्यात जल जीवन मिशन योजनेचे जवळपास १० कोटींचे कामे सुरु आहेत. योजनेचे काम हाती घेतलेल्या पन्नास टक्केच्यावर गावातून प्रशासनाकडे तक्रारी आल्या आहेत. परंतु प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे अनेक योजनांचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून अल्पावधीतच पाईप लाईनला गळती लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. तरी जल जीवन मिशनच्या कामाची सखोल चौकशी करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



प्रत्येक घरात पिण्याचे शुद्ध पाणी जावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून जल जीवन मिशनची कामे राबविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सध्या उरण तालुक्यातील बांधपाडा, कळंबुसरे व कोप्रोली ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा व्हावा यासाठी शासनाने करोडो रुपये खर्च करून जल जीवन मिशनची योजना चिरनेर गावातून जाणाऱ्या सिडकोच्या हेटवणे जलवाहिनीतून राबविण्यात आली आहे. मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जल जीवन मिशनच्या पाईप लाईनला वारंवार गळती लागत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे हजारो लीटर पाणी व खर्च करण्यात येणारा निधी वाया जात आहे. तरी जल जीवन मिशनच्या कामाची चौकशी करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## मानव-वन्यजीव संघर्ष विषयांवर जनजागृती

**उरण :** पोसरी ठाकूरवाडी येथील रायगड जिल्हा प्राथमिक शाळा, पोसरी, रसायनी,तालुका पनवेल येथे पिल्लई कॉलेज, रसायनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या श्रम संस्कार शिबिरात फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर-उरणतर्फे शून्य सर्पदंश मृत्यू अभियान व संस्थेच्या स्नेक बाईट ॲक्शन टीम या विषयावर संस्थेचे तुषार कांबळे यांनी सर्प ओळख, सर्पदंश कसे टाळावे व सर्पदंश झाल्यास काय करावे? संस्थेच्या शून्य सर्पदंश मृत्यू अभियान आणि स्नेक बाईट ॲक्शन टीम प्रकल्पाबद्दल तसेच पर्यावरण व मानव-वन्यजीव संघर्ष या विषयांवर जनजागृती केली. मेकॅनिकल आणि सिव्हिल इंजिनियरिंग या दोन्ही विभागाची एकूण ५० मुली-मुले कार्यक्रमासाठी उपस्थिती होती. सदर कार्यक्रमासाठी प्रा. विक्रम पवार, वैभव भगत, अपूर्वा देशपांडे, सायली कुलकर्णी अलका कांबळे, स्नेहा कांबळे आदी उपस्थित होते.



# साप्ताहिक राशिभविष्य ०१ ते ०७ फेब्रुवारी २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग मोबा.९४०४७९१७९८**

### प्रवासाचे योग संभवतात

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सरकारी नियमांना प्राधान्य द्या, व ते कसोशीने पाळा. आपण कार्यक्षेत्राबाबत दुसऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वतः जातीने लक्ष घातल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. कामाचा उत्साह वाढला तरी आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्रमंडळी व आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. हाती घेतलेल्या कामांनामार्गी लावण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. **महिलांना:** आपल्या मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात सावधानता बाळगा. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. शेतीविषयक कामांना प्राधान्य द्याल. **शुभ दिनांक :** ०२, ०३

### प्रलोभनात अडकू नका

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. वकिलांना हा काळ उत्तम राहील. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहावे, पोटाच्या विकाराबाबत सावध राहावे. प्रवासाचे य़ोग संभवतात. आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना स्थितप्रज्ञेने उत्तरे देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा चांगला जाईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. इतरांच्या बोलण्याने विचलित न होता त्यांना सामोरे जा. आपली शारीरिक प्रतिकारशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. एखादी नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता आहे. **महिलांना:** काही महत्त्वाच्या गोष्टींबाबत मौन पाळणे अधिक लाभदायक ठरू शकते. शेतीविषयक व कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक व्यवहारात योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या. **शुभ दिनांक :** ०४,०५

### आशावादी राहण्याचा प्रयत्न करा

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात हितशत्रूंवर नजर ठेवा. साहसी कृती आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. आपली बलस्थाने कोणती यांचा मागोवा घ्या व भावी आयुष्याचा विचार करून वागा. विद्यार्थ्यांना अध्ययनात प्रगती करता येईल. नेहमी आशावादी राहण्याचा प्रयत्न करा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा. आर्थिक बाजू ठीक राहील. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. शेती व कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल. घरगुती वातावरण चांगले राहील. सरकारी नियमांचे पालन करा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. थोरामोठ्यांच्या भेटी होण्याची शक्यता राहील. कोणालाही पैसे उधार देऊ नका. योग्य व्यक्तीची कामासाठी निवड करा व आपली जबाबदारी कमी करा. आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. **महिलांना:** बोलताना शब्द जपून वापरल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. **शुभ दिनांक :** ०६, ०७

### यशाचा मार्ग सुकर होईल

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात व्यापारात प्रगती करता येईल. आपण आपल्या कामावर एकाग्रता पाळून आपले नियोजित ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग सुकर होईल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. संगणक व तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यशाची अपेक्षा ठेवू शकतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. आपल्या नोकरी-व्यवसायात चैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होऊ शकतील. गुरूकृपेचा लाभ मिळू शकेल व घेतलेल्या कामात सफलता मिळेल. वरिष्ठांशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांचे पालन करा. **महिलांना:** कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील व्यक्तींशी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक :**०२,०६

### बुद्धिचातुर्याचा उपयोग करा

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. नियमित व्यायाम करा. विद्यार्थ्यांनी अध्ययनात अधिक परिश्रम घ्यावेत. प्रत्येक बाबतीत सावधानता बाळगल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा, जेणेकरून आपल्याबद्दल गैरसमज व नाराजी होणार नाही. आपली कुवत पाहूनच जबाबदारी स्वीकारा. सर्वांशी प्रेमाने वागल्यास आपल्याला मदतीचा हात येऊ शकेल. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. आपणास मिळणारे समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे. याबाबतीतला विचार करून वागण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा खऱ्या अर्थाने उत्तम घालवू शकाल. कौटुंबिक व कार्यालयीन कामे चातुर्याने पुरी करण्याचा प्रयत्न करा. **महिलांना:** कामाचा उत्साह वाढेल मात्र कटू बोलण्याचे प्रसंग कटाक्षाने टाळा. या सप्ताहात खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. **शुभ दिनांक :**०१,०४

### व्यवहारात सावधानता बाळगा

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. व्यवहारात सावधानता बाळगा. लांबचे प्रवास टाळा. सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. मात्र अहंकारापासून दूर राहा. अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष दिल्यास ते हितकारक ठरू शकेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. नोकरदारांना दिलासा मिळेल. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. **महिलांना:** आपण प्रकृतीस्वास्थ्यासाठी तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. **शुभ दिनांक :**०२, ०५

### वादाचे प्रसंग टाळा

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळा. मुलांकडे अधिक लक्ष द्या. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. प्रवासाचे योग संभवतात. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. **महिलांना:** वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला. आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. **शुभ दिनांक :**०३, ०६

### दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. नको त्या प्रलोभनात अडकू नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व्यापाराला चालना मिळेल. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. सप्ताहात आपण दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. राजकारण, क्रीडा क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच्या कामात झोकून द्या. प्रकृती जपा. **महिलांना:** आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. नोकरदारांना दिलासा मिळेल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक :**०४,०७

### रागावर नियंत्रण ठेवा

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील. आर्थिक बाजू ठीक राहील. आपण सर्वांशी सकारात्मक दृष्टीने वागल्यास आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकाल. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल, आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा 'इगो' दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न कराभक्तिमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. **महिलांना:**आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **शुभ दिनांक :**०२,०५

### आश्वासने देऊ नका

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. जोडीदाराची साथ मिळेल. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व मोसमी आजारापासून सावध राहा. सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. सरकारी देणी त्वरित भरा. आर्थिक बाजू सावरता येईल. खरेदीचे बेत साध्य होतील. घरासंबंधीचे प्रश्न सोडविता येतील. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. नोकरीव्यवसायात कर्तबगारीने पुढे जाऊ शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. आपले धोरण लवचिक ठेवण्याचा प्रयत्न करा. **महिलांना:** आपण आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घातल्यास आपण कोणतेही आव्हान स्विकारून पुढे जाण्याचा प्रयत्न सुलभ होऊ शकेल. नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा कालावधी चांगला जाऊ शकेल. घाई-गडबडीत कामे करण्याचे टाळा. आपल्या मेहनतीपेक्षा खर्च कमी करता येईल, याचा प्रयत्न करा. नेहमी सद्सद्बुद्धीने वागा. **शुभ दिनांक :**०३,०६

### पैसे उधार देऊ नका

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. प्रकृती जपा. वादविवाद, भांडणे, या गोष्टींपासून दूर राहिल्यास आपण पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. प्रलोभने टाळा. सरकारी नियमांचे पाळन कटाक्षाने करा. आपण काळ, काम व वेग यांचे नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. बाहेर जाण्याचे बेत आखाल. आपल्या कार्यात परिश्रमाने आपण यशाची वाट मिळवू शकाल. कोणत्याही परिस्थितीत मनाची चंचलता वाढणार नाही, याकडे अधिक लक्ष द्या. जन-माणसातील आपली प्रतिमा चांगली राहील. आर्थिक बाजू सावरता येईल. कोणालाही पैसे उधार देऊ नका. अध्ययनात मुलांनी अधिक श्रम घ्यावेत. आपल्या मनातली जी कामे करावयाची आहेत ती त्वरित सुरू करा, या कामात निरंकुश अधिकार आपणांस मिळू शकेल. **महिलांना:** आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. दूरचे मित्र मैत्रीण भेटण्याची शक्यता. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घेणे इष्ट ठरेल. वैवाहिक जोडीदाराशी मात्र जुळवून घेणे आवश्यक राहील. वादविवाद टाळा सकारात्मक दृष्टीने विचार केल्यास बरेच काही मिळविता येईल. **शुभ दिनांक :** ०४,०७

### व्यवसायात सावधानता बाळगा

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात किरकोळ गोष्टींकडे कानाडोळा करून ध्येयाचा विचार करण्याचा प्रयत्न करा. कामकाजात अधिक लक्ष दिल्यास लाभदायक ठरू शकते. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेणे योग्य राहील. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा आपले ग्रहमान संमिश्र स्वरूपाचे असल्याने कधी गरम कधी नरम असे असणार आहे. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. हितशत्रुचा ससेमिरा राहील, तेव्हा त्यांना संधी देऊ नका. आपले यश गुप्त ठेवणे हितकारक ठरू शकेल. प्रलोभने टाळा. आर्थिक व्यवसायात सावधानता बाळगा. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींचे कौतुक होईल. आप्तेष्टांत, मित्रमंडळीत आपण रमाल. ज्येष्ठांचे सहकार्य मिळेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करणे शक्य होईल. आपल्या वाहनाच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवल्यास उत्तम. त्याचप्रमाणे सरकारी नियम व कायद्याचे कटाक्षाने पालन करा. **महिलांना:** कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. वादविवाद टाळा. जीवनात आपले उद्दिष्ट जपण्याचा प्रयत्न करा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :**०२,०५




## राशीभविष्य

- **मेष** : ताप, आम्लपित्ताबाबत काळजी घ्यावी. खेळाडू, कलाकारांना संधी लाभतील. प्रवासात काळजी घ्या.
- **वृषभ** : नोकरी–व्यवसायात मनाजोगी प्रगती होईल. प्राप्तीचं प्रमाण वाढेल. स्पर्धांमध्ये उत्तम यश मिळेल.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं होतील. पूर्वीच्या गुंतवणुकीतून लाभ होईल. नोकरीच्या अपेक्षित संधी लाभतील.
- **कर्क** : व्यवसायात अधिक प्राप्ती होईल. सरकारी कामं मार्गी लागतील. यंत्र, उपकरणं जपून हाताळावीत.
- **सिंह** : व्यवसायात नैराश्य वाटू लागेल. व्यवसायात मोठं यश मिळेल. सहल, करमणूक आदींचा लाभ होईल.
- **कन्या** : अपेक्षित सुवार्ता कानी येईल. मित्रमंडळींकडून उत्तम लाभ होईल. प्रवासात प्रकृतीस त्रास संभवतो.
- **तूळ** : व्यावसायिक येणी वसूल होतील. विवाहाच्या प्रयत्नातील विलंब दूर होईल. लहान मुलांची चिंता राहील.
- **वृश्चिक** : मुलाखतींमध्ये उत्तम यश मिळेल. व्यावसायिक कर्जाची परतफेड होईल. नातेवाईकांचा रोष संभवतो.
- **धनु** : व्यावसायिक कामांचा वेग वाढेल. कौटुंबिक बाबतीत सुवार्ता कानी येईल. मुलांचा उत्कर्ष साधू शकाल.
- **मकर** : अचानक धनलाभाचे योग आहेत. खेळाडू, कलावंतांना उत्तम लाभ होईल. पतप्रतिष्ठेत वाढ होईल.
- **कुंभ** : व्यवसायात मोठी गुंतवणूक होऊ शकेल. परिचयोत्तर विवाहाच्या संधी लाभतील. बाकी चिंता नसावी.
- **मीन** : प्रेम प्रकरणात मतभेद संभवतात. नोकरीत विरोधाला सामोरं जावं लागेल. विचारानं रहायला हवं.

सौंदर्यसाधना

## फॉर ग्लोईंग स्कीन

वाढत्या वयाच्या खुणा सर्वात आधी चेहऱ्यावर दिसू लागतात. त्वचेवर सुरकुत्या पडणं, चेहरा काळपट दिसणं असं बरंच काही होतं. साधारणपणे तिशीनंतर चेहरा निस्तेज दिसू लागतो. म्हणूनच मग महिला महागड्या अँटी एजिंग क्रीम्सचा वापर करतात. यातल्या रसायनांमुळे त्वचेचा पोत सुधारण्याऐवजी बिघडतो. त्यामुळे अशा क्रीम्सऐवजी नैसर्गिक घटकांचा वापर करून त्वचेचं तारूण्य टिकवता येतं. हे घटक कोणते? त्यांचा कसा वापर करायचा, याविषयी...

* जोजोबा ऑईल मॉईश्चरायझरचं काम करतं. याच्या नियमित वापराने त्वचेवरच्या सुरकुत्या, फाईन लाईन्स कमी होतात. वाढत्या वयामुळे त्वचा कोरडी आणि सैल होते. पण जोजोबा तेलातले नैसर्गिक घटक त्वचेतल्या टिश्यूंना दुरूस्त करून तारूण्य टिकवून ठेवतात.

* डाळिंबाचे दाणे आरोग्यदायी असतात. यातल्या अँटी ऑक्सिडंट्समुळे शरीरातल्या फ्री रॅडिकल्सचं प्रमाण कमी होतं. तसंच अँटी एजिंग गुणधर्मामुळे डाळिंब त्वचेचा पोत टिकवून ठेवतं. **(क्रमशः)**

## १ फेब्रुवारी

दिनविशेष

१९४२ : नार्वेमध्ये क्विस्लिंग याने जर्मनांच्या हातचं बाहुलं असणारं सरकार स्थापन केलं.
१९६४ : 'युनिट ट्रस्ट'ची स्थापना.
१९८६ : सुप्रसिद्ध अभिनेता बापूराव माने यांचे निधन.
२००३ : अंतराळवीर कल्पना चावलाचा मृत्यू.
२०१३ : महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्यात बदल करून तो सक्षम करण्याच्या वटहुकमाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

करुन तर पाहा

## ढग बनवायचे?

आकाशातील ढगांसारखे ढग आपण घरीही तयार करू शकतो. कसा करायचा हा धमाल प्रयोग? जाणून घेऊ.

**साहित्य** : मध्यम आकाराचा जार, पाणी, शेव्हिंग क्रीमपासून तयार केलेला फेस, खाण्याचा निळा रंग आणि ड्रॉपर इत्यादी.

**कृती** : पाऊण जार पाण्यानं भरून घ्या. त्यावर शेव्हिंग क्रीमनं ढगासारखा आकार काढा. थोडा वेळ थांबा. आता या ढगावर खायचा रंग ओता. हा रंग ढगावरून जारमधील पाण्यात उतरू लागेल. यामुळे पाणी निळ्या रंगाचं दिसू लागेल. वर पांढरा शुभ्र ढग आणि खाली निळं पाणी असा हा नजारा खूप छान दिसेल. पाऊस पडतोय की काय, असं आपल्याला वाटू लागेल. पृथ्वीवरील पाण्याचं बाष्पीभवन होतं. या बाष्पाचा किंवा वाफेचा थंड हवेशी संपर्क झाल्यानंतर त्याचं पुन्हा पाण्यात रूपांतर होतं. पाण्याचे हे थेंब एकत्र जोडले जाऊन ढगांची निर्मिती होते. ढग पाण्यानं पूर्ण भरले की हे पाणी पावसाच्या रूपात पुन्हा पृथ्वीवर येतं. अशाच प्रकारचा हा प्रयोग आहे. गंमत म्हणून तुम्ही हा प्रयोग करू शकता.

पंचांग

**रविवार, १ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ शु. १५, चंद्रराशी : कर्क,
नक्षत्र : पुष्य, योग : प्रीति,
सूर्योदय ७.१५, सूर्यास्त ६.३०

फॉरवर्डस

**ज़िक्र सें नहीं फ़िक्र सें पता चालतां हैं ज़नाब...**

**इस दुनियाँ में अपना क़ौन हैं...!**

आरोग्यमंत्र

## करुन तर पहा

वाढतं वजन ही सध्या अनेकांना भेडसावणारी मोठी समस्या आहे. जीवनशैलीतील आणि आहारातील अयोग्य बदल हेच यामागचं खरं कारण आहे. हे एक दुष्टचक्र आहे असंही म्हणता येईल. कधीकधी वाढत्या वजनाने अनेक विकार मागे लागतात तर कधी मागे लागलेल्या काही आजारांमुळे अवाजवी न खाताही वजनवाढीचा त्रास संभवतो. अशावेळी काही उपायांनी वाढतं वजन रोखता येतं.



* आवळा आणि हळद समान मात्रामध्ये बारीक करून चूर्ण तयार करा. हे चूर्ण ताकामध्ये टाकून घ्यावे. या उपायाने वजन कमी होते.

* वाढते वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी टोन्ड मिल्क, टोन्ड दही आणि टोन्ड पनीरचा वापर करावा. या पदार्थांमध्ये कॅलरी कमी असतात आणि पोट बराच काळ भरल्यासारखे जाणवते.

* दररोज सकाळी आणि संध्याकाळी चालावे. कमीत कमी ४–५ किलोमीटर जलदगतीने चालण्याचा नियम करावा. दुपारी जेवणवर शतपावली अवश्य करावी. तुम्ही रात्री ८:३० नंतर जेवण करत असाल तर पोळी आणि भाताऐवजी डाळ आणि भाज्यांना प्राथमिकता द्या. रात्री हलका आहार घ्यावा. शक्यतो संध्याकाळी सातच्या आतच जेवण उरकावे.

* वजन लवकर कमी करण्याची इच्छा असेल तर आहारातून पांढरे पदार्थ (बटाटे, मैदा, साखर, तांदूळ) कमी करा आणि मल्टीग्रेन किंवा मल्टीकलर पदार्थ (डाळी, गहू, गजर, पालक, सफरचंद, पपई) खाण्यावर भर द्या.

## फॅशन पॅशन

* जीममध्ये कधीही बॉक्सर्स घालू नका. सायकलिंगच्या वेळी स्कीन फिट शॉर्ट ट्राय करता येईल. कॅप्री किंवा थ्री क्वॉर्टर कधीही फॅशनमध्ये नव्हत्या. त्यामुळे त्या बाजूलाच ठेवा.

* टी शर्टला टॅंक टॉप हा एक पर्याय आहे. हटके आणि गमतीशीर संदेश लिहिलेले टॉप्स तुम्ही घालू शकता. टॅंक टॉप्स ढगळ असतात. पण बारीक मुलं फिटिंगवाले टॉप्स घालू शकतात.

* जीमसाठी छानशी ट्रेंडी बॅग खरेदी करा. या बॅगमध्ये तुमच्या सगळ्या वस्तू बसतील.

## व्यवसाय सुरू करताना...

रोजगारवाटा

दोस्तांनो, सद्यस्थितीत नोकरीच्या क्षेत्रातील स्पर्धा बरीच वाढली आहे. शिवाय या क्षेत्रात आवश्यक त्या प्रमाणात संधी उपलब्ध होत नाही. या तसंच अन्य काही कारणांमुळे आजकाल स्वतंत्र व्यवसायाकडील कल वाढला आहे. मात्र व्यवसायाचा पाया रचताना काही चुका होऊ शकतात. म्हणूनच व्यवसाय सुरू करताना नेमकं काय करायला हवं याविषयी...

* बरेच जण आपल्या उत्पादनाचं मार्केटिंग करत नाहीत. मात्र मार्केटिंगवरील पैसे वाचवल्यामुळे तुमची प्रसिद्धी होऊ शकत नाही. सुरूवातीच्या टप्प्यात एकूण उत्पन्नाच्या १० ते २० टक्के रक्कम मार्केटिंगवर खर्च करायला हवी. थोडं सुस्थापित झाल्यावर हा खर्च पाच ते दहा टक्क्यांवर आणता येईल.




* उद्योजकांची टीम चांगली हवी. चुकीच्या लोकांची निवड केल्यामुळे तुमचं बरंच नुकसान होऊ शकतं. त्यामुळे गुणवान, कुशल आणि कल्पन लोकांची निवड करा. यामुळे तुमच्या व्यवसाय वृद्धीला गती मिळू शकेल.

* बरेच पण 'परफेक्शन'च्या मागे लागतात. एखादं ॲप तयार करताना बराच वेळ घालवतात. त्याऐवजी आपल्या उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यावर भर द्यायला हवा. उत्पादनाची गुणवत्ता सुधारली की तुमचं उत्पादन लोकप्रिय होईल.

खेचाखेची

## ते झाड!

लग्नापूर्वी ती त्याला म्हणाली,
'ते बघ... ते झाड'!

आणि त्याच्या मनात अनेक रोमॅन्टिक आठवणी जाग्या झाल्या.

लग्नानंतर, ती त्याला म्हणाली,
'ते बघ....... ते झाड'!

आणि, मुकाट्याने त्याने कोपऱ्यातला झाडू उचलला.

## वेगळं काही

हाड नसलेला जीभ हा शरीरातला एकमेव अवयव आहे. आपल्या जिभेवर चवीची जाणीव करून देणारे बरेच तंतू असतात. अर्थात जिभेव्यतिरिक्त गालांच्या आत, ओठांवर तसंच तोंडाच्या वरच्या बाजूला तसंच जिभेच्या खालीही चवीची जाणीव करून देणारे तंतू असतात. चवीसाठी आपल्या तोंडात जवळपास दहा हजार तंतू असतात. त्यापैकी आठ हजार तंतू जीभेवर असतात. वेगवेगळ्या चवींची जाणीव करून देणारे विविध विभाग जिभेवर असतात. आंबट, गोड, तिखट, खारट, तुरट अशा चवींची जाणीव जीभ करून देते. चवींबाबत संवेदनशील असलेला आणि त्याच्या लहरी मेंदूपर्यंत पोहोचवणारा जीभ हा शरीरातला एकमेव अवयव.

## शेंगोळेची रूचकर डिश

रूचिरा

कोणत्याही पदार्थाची रूची वाढवण्यासाठी त्या वैविध्य आणणं गरजेचं ठरतं. त्यादृष्टीने आज शेंगोळे ही रूचकर डिश कशी बनवायची ते जाणून घेऊ...

**साहित्य :** एक वाटी गव्हाचं पीठ, अर्धी वाटी ज्वारीचं पीठ, पाव वाटी डाळीचं पीठ, एक चिरलेला कांदा, तीन चमचे आलं–लसूण पेस्ट, दोन चमचे तिखट, एक चमचा हळद, चिमुटभर हिंग, मोहरी, तीन चमचे तेल, कोथिंबीर, एक चमचा गरम मसाला इत्यादी.



**कृती :** सर्वप्रथम तीनही पीठं एकत्र करा. त्यात आलं–लसूण पेस्ट, हळद, तिखट, मीठ, कोथिंबीर तेल घाला. आता त्यात पाणी घालून घट्ट कणीक भिजवून घ्या. त्यानंतर कणकेच्या छोट्या गोळ्याला नळीसारखा लांबट आकार देऊन कडबोळ्यासारखं वळवा. अशा प्रकारे सगळे शेंगोळे तयार करुन घ्या. दुसरीकडे पॅनमध्ये तेल, मोहरी, कांदा–लसूण, जिरे घाला. तिखट, हळद, मीठ घालून दोन ग्लास पाणी घाला. पाण्याला उकळी आली की त्यात शेंगोळे सोडा. आता त्यात गरम मसाला घाला. पंधरा मिनिटं मंद आचेवर शिजू द्या. शेंगाळे शिजले की वर तरंगू लागतात. यावेळी गॅस बंद करा. आता चिरलेली कोथिंबीर घालून डिश सजवा.

## सुडोकू ६१


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | | | ७ | | | | ६ |
| ७ | ५ | ६ | २ | ९ | | | १ | ३ |
| | | | | | ३ | | | |
| | ८ | | | | २ | १ | | ५ |
| | १ | | | | | | ३ | |
| ३ | | ७ | ८ | | | | ९ | |
| | | | ५ | | | | | |
| ९ | ३ | | | २ | ७ | ८ | ६ | ४ |
| ४ | | | | ६ | | | ५ | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६०चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ५ | २ | १ | ९ | ८ | ७ | ४ |
| ४ | ९ | १ | ५ | १ | ७ | ६ | २ | ३ |
| २ | ७ | ८ | ६ | ३ | ४ | १ | ५ | ९ |
| ९ | ८ | ३ | १ | ६ | २ | ७ | ४ | ५ |
| ५ | ६ | ४ | ८ | ९ | ७ | २ | ३ | १ |
| ७ | १ | २ | ४ | ५ | ३ | ९ | ६ | ८ |
| ३ | २ | ६ | ९ | ८ | ५ | ४ | १ | ७ |
| ८ | ४ | ७ | ३ | २ | १ | ५ | ९ | ६ |
| १ | ५ | ९ | ७ | ४ | ६ | ३ | ८ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ६१



**आडवे शब्द :-**
१) जोड, भेग, कानाकोपरे इ.
५) नायनाट, संपविणे
१०) प्रजा, लोक
११) पालिकेतील लोकप्रतिनिधी
१४) मनाला आलेला थकवा
१६) सोसाट्याचा वारा
१७) वड, एक वृक्ष
१८) दागिन्यातील झीज, नुकसान
१९) अवस्था, स्थिती
२०) नंतर
२१) कर्णेंद्रिय
२२) नाचणी धान्याचे एक नाव
२३) विचारांचे अदृश्य इंद्रिय
२४) दु:ख
२७) रात्र
२९) वडिलांची बहीण
३०) फार मोठा फायदा
३२) माणूस
३३) तादाम्य, एकरूप
३५) किंमत
३६) सोन्याचा धागा
३७) गुंड,मोठा भाऊ
३८) मतमोजणी
४०) नदीचा काठ
४३) खाट, पलंग
४५) मृत्युदेवता
४७) फळाचे साल
४९) धोकादायक (हिं.)
५१) फोडातील द्रव
५२) नक्की, खात्रीने
५३) किरकोळ सामान
५४) शेवट, नाश
५५) कोषागार, भांडार
५८) एक उभयचर प्राणी
५९) एक भारतीय युद्धनौका
६१) अनाथ
६२) चलनवलन
६३) व्यापारी नफा
६४) शिव्याशाप.

**उभे शब्द:-**
१) संध्याकाळ
२) दुबळा, गरीब
३) गरीबांवर दया करणारा
४) निवासस्थान
५) वात्रट
६) साखरेचा रस
७) ओलसर
८) पुरुष
९) हालचालीवर ठेवलेली नजर
१२) मासा पकडण्याचे एक साधन
१३) चाकरी, पूजाअर्चा
१५) अंबर
१८) निरुपयोगी लोकांची भरती
२१) यम, वेळ
२३) मुलांच्या भाषेत मांजर
२४) शस्त्र, उपकरण
२५) खून, वध
२६) बोटाच्या टोकावरील आवरण
२८) अफवा
२९) विधानसभेचा सदस्य
३०) मीठ
३१) शरम
३३) सद्वर्तन
३४) ठाणवई
३५) विष्णूभक्त, भगवंत विषयक
३९) पूर्ण नाश
४१) भात शिजतानाचा आवाज
४२) यशस्वी, फलद्रूप
४४) दिल्लीच्या विमानतळाचे नाव
४६) तिळगूळ, हलवा वाटण्याचा सण
४८) लसणाची पाकळी
४९) अफूचे बीज
५०) जिव्हा
५२) निरूपाय झालेला
५६) पाणी, आयुष्य
५७) मीठाची चव
५८) आजच्या आधीचा दिवस
६०) बूड, खालचा पृष्ठभाग
६१) बैलाचा सण

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# दादांचा महिमा आणि राष्ट्रवादीचे भविष्य

**अजित पवार यांच्या अकाली जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू झाला आहे. अजितदादा असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली होती. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर त्यावर चर्चा अपेक्षित होती; परंतु अजित पवार यांच्या निधनानंतर आता लगेच त्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे भवितव्य काय, असा विचार सुरू झाला आहे.**

जनार्दन पाटील

अजितदादांच्या निधनामुळे राज्याच्या राजकारणातला एक महत्वाचा मोहरा अचानक अस्तंगत झाला. या घटनेने तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अतोनात नुकसान केले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार आता पक्ष सक्षमतेने सांभाळण्याच्या परिस्थितीत दिसत नाहीत. एक धुरीण म्हणून ते अखंड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व नक्कीच करतील, पण त्या पलिकडे जाऊन दोन्ही पक्षांमधील सर्व गट तट जोडणे, एका व्यासपिठावर आणणे आणि काळाला अपेक्षित असे हरहुन्नरी नेतृत्व देणे त्यांना या घडीला शक्य नाही. कदाचित म्हणूनच अजित पवार यांची उणीव मोठ्या प्रमाणात जाणवणार आहे. मागे वळून पाहताना तर त्यांच्या एकहाती करिष्म्यामुळे अलिकडच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला तारले होते, हे स्पष्टपणे जाणवते. त्याला अर्थातच त्यांचे दिलखुलास व्यक्तिमत्व कारणीभूत ठरले. या अनुषंगाने अनेक छोटी मोठी उदाहरणे देता येतात. अगदी अलिकडचे एक छोटे उदाहरण म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीकडे पाहता येईल. प्रचारासाठी जात असताना त्यांनी एक अपघात पाहिला तेव्हा तिथे थांबून अपघातातील जखमीला तातडीने रुग्णालयात पाठवले. हे अपवादात्मक उदाहरण नाही. नगर जिल्ह्यात एका अपघातातील जखमीसाठी स्वतःची गाडी थांबवली. त्या गाडीतच रुग्णाला दवाखान्यात पाठवून उपचाराची व्यवस्था केली आणि दादा दुसऱ्याच्या गाडीत पुढे निघून गेले. दादा असे माणुसकी जपणारे होते. त्यातूनच त्यांनी मोठा लोकसंग्रह केला आणि लोकनेता बनले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, विलास देशमुख, आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर महाराष्ट्र असाच अस्वस्थ झाला होता. अजित पवार हा लढवय्या नेता होता. काका शरद पवार यांचे बोट धरून ते सार्वजनिक जीवनात आले. पण त्यांनी आपल्या कामाने महाराष्ट्राच्या राजकारणात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी शरद पवारांच्या विरोधात जुलै २०२३ मधे बंडाचा झेंडा फडकवला, पक्षाचे चाळीस आमदार घेऊन ते भाजपप्रणित महायुतीच्या छावणीत दाखल झाले. एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव व घड्याळ हे चिन्ह त्यांनी आपल्या पक्षाकडे घेण्यात यश मिळवले.

शरद पवारांनी १९९९ मधे स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस या नावाचे दोन पक्ष झाले. काकांच्या पक्षाला तुतारी चिन्ह मिळाले. दोन पक्ष वेगळे, दोन चिन्ह वेगळी. पण पवार परिवारात कौटुंबिक संबंध सलोख्याचे राहिले. अजितदादा म्हणजे शब्दाला पक्का, कामाला वाघ होता. त्यांच्या मृत्युने राजकारणातील एक झंझावात संपला. प्रशासनावर त्यांची जबरदस्त पकड होती. दुसरीकडे, ते सर्वसामान्य जनतेचे आणि कार्यकर्त्यांचे खऱ्या अर्थाने दादा होते. चुकीचे काम कोणी आणले तर ते होणार नाही, असे रोखठोक सांगणारा त्यांचा स्वभाव होता. २०२२ मध्ये शरद पवारांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तेव्हा अजितदादांनी नवीन चेहऱ्यांना सधी दिली जाईल असे म्हटले होते, पण शरद पवारांनी चार दिवसांमध्येच राजीनामा मागे घेतला. त्यानंतर अजितदादांनी बंडाचा झेंडा फडकवण्याचा निर्णय घेतला आणि एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील सरकारमधे सामील झाले.

अजितदादांच्या अनोख्या व्यक्तिमत्वाची जडणघडण याच मातीमध्ये झाली आणि ती कोणत्याही सामान्य तरुणाच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीला साजेशी होती. कोल्हापूर येथून शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर अजितदादांनी काटेवाडीमध्ये शेती करायला सुरुवात केली. प्रारंभी त्यांनी टोमॅटोची लागवड केली. टोमॅटोचे हे पीक पाहण्यासाठी दुरून शेतकरी येत असत. त्यानंतर दादांनी शेतीक्षेत्रात विविध प्रयोग केले. दुधाचा व्यवसाय केला. जनावरांची खरेदी केली. त्या वेळी ते जनावरांसाठी बाजारातून स्वतः कडबा खरेदी करत. याशिवाय त्यांनी कुक्कुटपालन व्यवसायही केला. हे सगळे उद्योग करताना सगळी कामे ते स्वतः करत. दादांनी काटेवाडी ते कन्हेरी परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले. लोकांना मदत करण्याची त्यांची भूमिका आधीपासूनच पहायला मिळालेली. लोकांनी मांडलेले प्रश्न, अडीअडचणी घेऊन ते शरद पवार यांच्याकडे जात. तिथे प्रश्न मार्गी लावत असत. अशा पद्धतीने समाजकारण करता करता अजितदादा राजकारणाच्या वाटेवर येऊन उभे राहिले. वेगवेगळी खाती सांभाळताना अजितदादांनी शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेतले. दादांचा राजकारणापर्यंतचा प्रवास एक प्रगतशील शेतकरी, लघुउद्योजक, संचालक, अध्यक्ष, उपमंत्री, मंत्री आणि उपमुख्यमंत्री असा टप्पाटप्प्याने झाला. प्रत्येक पदावर उत्तम काम केल्यामुळे त्यांना पुढची संधी मिळत गेली. प्रत्येक पदाची जबाबदारी सांभाळताना दादांनी त्यांची योग्यता, गुणवत्ता सिद्ध केली. म्हणूनच वारसा म्हणून दादा राजकारणात आले किंवा त्यांना पदं मिळाली असे अजिबात झाले नाही.



अजितदादांनी जलसंपदा मंत्री या पदाची धुरा सांभाळताना, कार्यभार पाहताना महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा अत्यंत बारकाईने आणि गांभीर्याने अभ्यास केला होता. यातून भूगर्भातील पाण्याच्या पातळीत होणारी घट आणि त्यातच राहणारी पावसाची अनियमितता यासारखे अनेक प्रश्न समोर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. यावर तोडगा म्हणून धरण बांधकामाची सुरुवात, कॅनॉल, कालवे इत्यादी कामे त्यांनी प्राधान्याने पूर्णत्वाला नेली. याशिवाय 'पाणी साठवण योजने'यासारख्या योजना राबवल्या. यामुळे पाण्याची अडचण दूर झाली. दादा जितके कठोर, तितकेच मिश्कील होते. खोरेनिहाय धरण, पाटबंधारे, पाणलोट यासंदर्भात सर्वांगीण विचार करताना दादांनी धडक कामे मार्गी लावली. अजित पवार यांच्या अकाली जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू झाला आहे. अजितदादा असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली होती. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर त्यावर चर्चा अपेक्षित होती; परंतु अजित पवार यांच्या निधनानंतर आता लगेच त्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे भवितव्य काय, असा विचार सुरू झाला आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचीही वाताहत झाली आहे. अशा वेळी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येतील का, त्याचे नेतृत्व कोण करेल असा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

'ईडी'च्या भीतीने अजितदादांबरोबर गेलेले लोक पुन्हा शरद पवार गटाबरोबर येतील का, या प्रश्नाचे उत्तर नाही असे असेल. त्यामुळे चर्चा विलीनीकरणाची असली, तरी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांचाच पक्ष कदाचित अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा आग्रह धरला जाण्याची शक्यता आहे. विलीनीकरणाचा निर्णय तूर्त बाजूला ठेवला, तरी अजित पवार यांच्या जागी उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाचा आग्रह पक्षातून धरण्यास सुरुवात झाली. नरहरी झिरवळ यांनी ही मागणी सर्वात अगोदर केली. त्यानंतर प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केली. सुनेत्रा पवार खासदार आहेत. त्यांना राज्यसभेचा राजीनामा देऊन बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडून यावे लागेल. असे असले, तरी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि अन्य जबाबदाऱ्या त्या पेलू शकतील का, याबाबत संभ्रम आहे.

अजित पवार यांच्यानंतर पक्षाला सक्षम, दूरदृष्टी असलेले आणि जनतेशी थेट संवाद साधू शकणारे नेतृत्व आवश्यक आहे. युवा नेतृत्वाला संधी देणे, नव्या पिढीशी संवाद वाढवणे आणि संघटनात्मक बांधणी मजबूत करणे, हे अत्यावश्यक ठरणार आहे. केवळ घराणेशाहीवर अवलंबून राहून पक्ष दीर्घकाळ टिकू शकणार नाही, हे वास्तव नेतृत्वाने ओळखणे गरजेचे आहे. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसला पुन्हा आपल्या मूळ विचारधारेकडे वळावे लागेल. शेती, ग्रामीण विकास, सामाजिक न्याय आणि सहकार क्षेत्रातील काम ही पक्षाची ओळख राहिली आहे; मात्र अलीकडच्या काळात ही ओळख काहीशी फिकी पडली आहे. ती पुन्हा मजबूत करण्यासाठी ठोस धोरणे आणि जनहिताच्या मुद्द्यांवर सातत्यपूर्ण लढा आवश्यक आहे. भविष्यात राष्ट्रवादी काँग्रेस टिकून राहायची असेल, तर अंतर्गत मतभेद मिटवणे, विश्वास पुनर्स्थापित करणे आणि जनतेमध्ये सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे गरजेचे आहे. अन्यथा, हा पक्ष केवळ इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय म्हणूनच ओळखला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकूणच, अजित पवार यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे भवितव्य नेतृत्वाच्या परिपक्वतेवर, संघटनशक्तीवर आणि जनतेशी असलेल्या नात्यावर अवलंबून असेल. योग्य दिशेने पावले टाकली, तर पक्ष पुन्हा उभारी घेऊ शकतो; अन्यथा, त्याची राजकीय ताकद हळूहळू कमी होत जाईल.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत अजितदादान नेहमीच आक्रमक भूमिका घेताना दिसले. कर्जमाफी, नुकसानभरपाई, पीक विमा योजना अशा विषयांवर त्यांनी वेळोवेळी सरकारवर दबाव आणला. त्यामुळे ग्रामीण भागात त्यांची कायम लोकप्रियता राहिली. राजकारणात अनेकदा नेते संभ्रमात राहतात; मात्र अजित पवार यांनी नेहमीच स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली. नेतृत्व म्हणजे सर्वांनाच खूश करणे नसते, तर योग्य वाटणारा मार्ग निवडणे असते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले होते. सरकारी फाईलींचा ढीग न करता निर्णय त्वरित घेणे, अधिकाऱ्यांकडून वेळेत काम करून घेणे हा त्यांचा स्वभाव होता. काही वक्तव्ये, काही निर्णय आणि सत्तासंघर्ष यामुळे ते टीकेचे धनी झाले होते; मात्र त्यांनी कधीही टीकेमुळे काम थांबवले नाही. लोकशाहीमध्ये टीका अपरिहार्य असते. त्यातून शिकत पुढे जाणे, हीच परिपक्व नेतृत्वाची खूण असते. अजित पवार यांनी स्वतःला वेळोवेळी बदलत, सुधारत पुढे जाण्याचा प्रयत्न केला होता. मोठ्या पदावर असूनही त्यांनी जनतेशी असलेला संपर्क तुटू दिला नाही. त्यांच्या वाटचालीत चढ-उतार आले, वाद झाले, टीका झाली; पण काम करण्याची जिद्द मात्र कायम राहिली. आजच्या राजकारणात केवळ घोषणांची गर्दी दिसते. प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवणारे नेते दुर्मिळ होत चालले आहेत. त्यात अजित पवार होते. दुर्दैवाने आज ते आपल्यात नाहीत.

**

# अनाकलनीय अपघात आणि चार्टर्ड विमान प्रवास-प्रगतीचे पंख की निग्रहाची परीक्षा?



धनंजय शेटये

काल-परवाच्या त्या भीषण विमान अपघाताची वार्ता कानावर धडकली आणि मन एखाद्या सुन्न झालेल्या पाखरासारखे थबकले. मानवी प्रगतीने विज्ञानाच्या आकाशाला गवसणी घातली खरी, पण त्याच विज्ञानाच्या मर्यादा जेव्हा उघड्या पडतात, तेव्हा मानवी जीवनाचे क्षणभंगुरत्व अस्वस्थ करून सोडते. प्रगतीच्या वेगाला जेव्हा अपघाताचे ग्रहण लागते, तेव्हा जाणवते की, आपण कितीही उंच उडालो तरी शेवटी नियतीच्या चक्रापुढे आपले अस्तित्व एका विजा चमकण्याइतकेच मर्यादित आहे.

**स्वप्नांच्या पंखांना जेव्हा विज्ञानाचे बळ मिळते...**

निळ्याभोर नभाच्या अथांग पटावर मुक्त संचार करण्याची स्वप्ने मानवी संस्कृतीने युगायुगांपासून जपली आहेत. आपल्या प्राचीन ऋचांमधील 'पुष्पक विमान' हे केवळ लाकूड-धातूचे यंत्र नव्हते, तर ते मानवी प्रबळ इच्छाशक्तीचे उडते प्रतीक होते. संत तुकाराम महाराजांचे सदेह वैकुंठगमन असो किंवा कृष्णाच्या जन्मावेळची ती दैवी आकाशवाणी; या कथांतून हेच ध्वनित होते की, जेव्हा मानवी आत्मा निर्मळ होतो आणि जिज्ञासा जागी होते, तेव्हा हे विशाल आकाशही त्याच्या स्वागतासाठी नतमस्तक होते. माणूस आधी श्रद्धेच्या बळावर उडाला, कल्पनेच्या विश्वात विहरला आणि मग विज्ञानाने त्याच्या त्या स्वप्नांना वास्तवाचे 'लोखंडी पंख' बहाल केले.

**वेळेचे मोल आणि आधुनिकतेचा राजेशाही थाट**

आजचे युग हे 'गती' आणि 'गंतव्याचे' आहे. जिथे सेकंदाच्या काट्यावर कोट्यवधींच्या उलाढालींचे भवितव्य अवलंबून असते, तिथे 'चार्टर्ड विमान प्रवास' ही केवळ विलासी चैन न राहता एक अपरिहार्य गरज बनली आहे. उद्योजक, राजकारणी आणि कलाकारांसाठी 'वेळ' हेच सर्वात मोठे वैभव असते. विमानतळांवरील त्या अनंताच्या रांगा आणि वेळापत्रकाचे जाचक पाश तोडून, जेव्हा एखादे विमान केवळ तुमच्या एका इशाऱ्यावर निळ्या क्षितिजाचा वेध घेते, तेव्हा तो प्रवास केवळ विज्ञानाचा विजय नसून तुमच्या कर्तृत्वाचा आरसा ठरतो. ही जीवनशैली एका बाजूला ऐश्वर्याचा लखलखाट मांडते, तर दुसरीकडे 'कार्यक्षमता' हेच आधुनिकतेचे परम सूत्र असल्याचे अधोरेखित करते.

**ऐश्वर्याची सावली आणि सामाजिक वास्तवाचे ऊन**

मात्र, या झगमगाटी प्रवासाला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीची एक गंभीर झालरही आहे. एका लहान समूहाच्या सुखासाठी होणारा प्रचंड इंधनाचा वापर आणि त्यातून डोकावणारी आर्थिक विषमता हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. एका बाजूला सात समुद्र ओलांडण्याची जिद्द आहे, तर दुसरीकडे तळागाळातील माणसाचा मातीतील संघर्षाचा प्रवास आहे. म्हणूनच, चार्टर्ड प्रवास ही जरी यशाची उत्तुंग शिखरं सर करण्याची संधी असली, तरी त्यासोबतच निसर्गाप्रती असलेली कृतज्ञता आणि सामाजिक संतुलनाचे भान जपणे, हीच खऱ्या अर्थाने 'उच्च' जीवनशैली ठरते.

**सुरक्षेचे कवच आणि आव्हानांचे अथांग आकाश**

नभातील हा प्रवास जितका मोहक, तितकाच तो निसर्गाच्या लहरीपणाशी झुंजणारा असतो. ही विमाने अनेकदा आकाराने लहान असल्याने धुके, वादळ आणि वाऱ्याच्या झोतांशी त्यांना दोन हात करावे लागतात. तांत्रिक बिघाड किंवा मानवी त्रुटींच्या सावल्या या प्रवासात सदैव पाठलाग करत असतात. तथापि, आधुनिक यंत्रणा आणि प्रगत रडारमुळे हे धोके आता बऱ्यापैकी नियंत्रणात आले आहेत. केवळ दबावाखाली निर्णय न घेता, तज्ज्ञ वैमानिकांचे कौशल्य आणि विज्ञानाचा विवेक यांच्या संगमातून झालेला प्रवासच खऱ्या अर्थाने निर्धोक आणि आनंदी ठरतो.


**अखेरची भरारी...**

अखेर, चार्टर्ड विमान प्रवास म्हणजे केवळ धातूच्या यंत्राचे उड्डाण नव्हे, तर ती मानवी बुद्धिमत्तेने निसर्गाच्या आव्हानांवर मिळवलेली एक दैदिप्यमान मात आहे. हा प्रवास प्रगतीचा गौरव करतो, वेळेचा सन्मान करतो आणि मानवी स्वप्नांना क्षितिजापलीकडे नेण्याचे बळ देतो. गरज आहे ती फक्त सुरक्षेचे भान जपण्याची आणि प्रगतीच्या या अफाट वेगाला 'जबाबदारीच्या इंधनाची' जोड देण्याची. तरच हे आकाश आपलेसे वाटेल आणि हा प्रवास सुखकर ठरेल.

**

# शाळेत पटसंख्या वाढवायची असेल तर...

**शाळा....... शाळाही आपलं कुटुंब आहे. शाळेत आपण आपल्या जीवनातील बराच काळ काढतो. शाळा आपलं जीवन घडवते. शाळा जर नसेल तर शिक्षकांचे पोट भागत नाही आणि शाळा जर नसेल तर मुलांना अभ्यास शिकता येत नाही. त्यातच शाळा जर ऑसेल तर विद्यार्थ्यांना आपले आयुष्य घडवता येत नाही.**



अंकुश शिंगाडे

आज मराठी शाळा ओस पडत आहेत व इंग्रजी शाळा वाढत चाललेल्या आहेत. याचं कारण काय असावं? यातील कारणांचा शोध घेतांना लोकं पालकांना दोष देतात. म्हणतात की पालकांचा कल इंग्रजी माध्यमाकडे जास्त आहे. त्यांना मराठी शाळा अजिबात आवडत नाहीत. त्यातच लोकं तशी प्रतिक्रिया देवून मोकळे होतात. परंतु यात पालकांचा दोष नाहीच. दोष आहे शिक्षकांच्या शिकविण्याचा. त्यातच त्यांच्या भांडणाचा. मराठी शाळेतील जिल्हापरीषद शाळेतील शिक्षक मंडळी ही बहुतांश भागात बहुतांश प्रमाणात आपल्या शाळेतच राहात नाहीत. बऱ्याच शाळेत ते आठवड्यातून फक्त दोन दिवस शाळेत दिसतात. हीच वास्तविकता आहे आजची. त्यातच काही शाळेत शिक्षक दिसतात तर ते पुर्ण वेळ अगदी चांगल्या पद्धतीनं आज शिकवितांना दिसत नाहीत. असं बऱ्याच ठिकाणी घडतं. मग चर्चा होते व ती चर्चा एवढ्या दूर पसरते की लोकं आपली मुलं जिल्हापरीषद शाळेत टाकायला तयार होत नाहीत. ते पैसे लागले तरी चालतात. असा विचार करुन कॉन्व्हेंटच्या शाळेत पुर्ण वेळ वर्गातच बसून राहणाऱ्या शिक्षकांच्या सानिध्यात टाकतात. त्यातच आज जरी अशा कॉन्व्हेंटच्या शाळेत मुलांना शिकवीत नसले तरी ती पालकांना गरज वाटते. ज्याप्रमाणे जिल्हापरीषदच्या ग्रामीण भागात शिक्षकांचं शिकविणं पालकांना निराश करतं. त्याचप्रमाणे शहरी भागात जिल्हापरीषद अंतर्गत चालणाऱ्या खाजगी शाळाही असतात.त्या शाळेत गटबाजी चालते. ज्या गटबाजीत संस्थाचालक एक ट्रस्टी असून तो स्वतःला मालकच समजतो. त्यानंतर तो शिक्षकांकडून त्यांना मिळणाऱ्या वेतनातून पैसा कमवतो. ज्यातून असा पैसे देणारा शिक्षक शाळेत शिकवीत नाही. त्यातच काही असा पैसा न देणारेही बरेच शिक्षक असतात. ज्यांचा वाद सुरु हैतो संस्थाचालकाशी. मग असा वाद सुरु झाला की आरोप प्रत्यारोप होतात शिक्षकांवर. त्यातच चांगले शिकविण्याचे काम जरी शिक्षक करीत असला तरी त्याची मानसिकता खराब होते. ज्यातून त्याच्या हातून चांगलं शिक्षण मुलांत उतरत नाही. त्यानंतर हेच वाद वा शिक्षकांचं न शिकविणं पालकांना माहीत होतं व शाळा तुटते. जर शाळा वाढवायची असेल तर अशा प्रकारचा वाद होवूच नये. कोणतेही वाद हे सामोपचाराने सोडवावेत. विद्यार्थ्यांना चांगलं शिकवावं. ती गरज आहे. ज्यातून शाळा वाढू शकते व विद्यार्थीही वाढू शकतात.

ड्युटी ही अतिशय महत्त्वपूर्ण गोष्ट. तिथे आपण आपल्या जीवनातील बराच काळ काढत असतो. नव्हे तर काढावाच लागतो. जर आपण तसा वेळ काढत नाही, असं म्हटल्यास आतिशयोक्ती होईल. कारण ड्युटीमुळं आपल्या घरादाराची शोभा वाढते. कारण ड्युटी आपलंच पोट नाही तर आपल्या कुटुंबाचं पोट भागवते. आपल्या गरजाही पुर्ण करते.

शाळा....... शाळाही आपलं कुटुंब आहे. शाळेत आपण आपल्या जीवनातील बराच काळ काढतो. शाळा आपलं जीवन घडवते. शाळा जर नसेल तर शिक्षकांचे पोट भागत नाही आणि शाळा जर नसेल तर मुलांना अभ्यास शिकता येत नाही. त्यातच शाळा जर ऑसेल तर विद्यार्थ्यांना आपले आयुष्य घडवता येत नाही.

शाळा हे ज्ञान देण्याचे केंद्र आहे. अशा शाळेत आपण ज्ञान घेत असतो आणि ज्ञान देतही असतो. त्यामूळं तो आपला परीवार बनतो. संयुक्त परिवार. त्यातच अशा परिवारात माणूसकीचं आणि आपुलकीचं नातं निर्माण होतं. परंतु हे जरी खरं असलं तरी आज त्या परिवारातील संबंध बिघडले आहेत नव्हे तर बिघडवले गेले आहेत. हे संबंध अलिकडील काळात खाजगीकरणानं बिघडवले आहेत. शाळा या अलिकडील काळात खाजगी बनल्या. ज्यातून मालक नावाची पद्धत आली. या पद्धतील मालक असलेला व्यक्ती हा अज्ञानी असतो व नोकर असलेला व्यक्ती हा सुशिक्षित असतो. मालक असलेला व्यक्ती हा अज्ञानी असल्यानं त्याला मुल्य, क्षमता, ध्येय या गोष्टी समजतच नाहीत. समजतं फक्त पैसा कमविणं. जो पैसा एक बाजारु स्त्री कमवत असते.

अलिकडील काळात शाळेत आलेल्या मालक नोकर या पद्धतीत शिक्षक नावाचा कर्मचारी कितीही शिकला तरी त्याची इज्जत ही होत नाही. कारण त्याच्याकडे मालक एक कर्मचारी म्हणून न पाहता, फक्त एक कामगार म्हणून पाहतो. त्यातच अशा शिक्षकांना कामगार समजून तो त्याला मिळणाऱ्या वेतनातून पैशाची वसूली करतो. त्याच्याकडून श्रम जास्त घेतो आणि त्याला श्रमाचा मोबदला हा कमी देतो. असं प्रत्येक ठिकाणी घडतं. अशाच पैशाच्या व्यवहारानं शाळेत असलेलं आपुलकीचं नातं नष्ट होतं व स्वार्थ शिरतो. ज्यातून वाद, प्रतिवाद, भांडणं, एकमेकांना पिटणं सुरु होतं. आज शाळेतील कोणत्याच सदस्यांत आपुलकीची भावना दिसून येत नाही. विद्यार्थ्यांबद्दलही आपुलकीची भावना शिक्षकात दिसून येत नाही. त्यातच काही आजचे शिक्षक त्यांच्या हातात शिकणाऱ्या मुलींवर डोळे टाकत असतात व वात्रटसारखे बोलत असतात. त्यातच काही तांदळातील खड्यांसारखे असलेले शिक्षकही आपल्याच शाळेतील मुलींना भाळवतात. ज्यातून असे शिक्षक अशा मुलींना ब्लॅकमेल करुन बलात्कारासारखे पाशवी अत्याचार करतात. तरीही अशा शिक्षकांवर कारवाई शुन्य असते. कारण ते शिक्षक मालकांचे नातेवाईक असतात.

आजच्या शाळा या कारखान्यासारख्याच बनल्या आहेत. फरक फक्त एवढाच दिसतो की कारखान्यात कच्च्या मालाचं उत्पादन पक्क्या मालात होतं तर शाळेत कच्च्या विद्यार्थ्यांचं रुपांतर एका आदर्श नागरीकात होतं. तेही अलिकडील काळात बरोबर होत नाही. त्याचं कारण आहे, शाळेत आलेले पैशाला महत्व. मालक नावाचा सधन व्यक्ती आणखी सधन बनण्यासाठी त्याच्या शाळेत असलेल्या इतर शिक्षकांना लुटतो. त्यातच काही शिक्षक आपल्या मालकाला पैसे देतात. बदल्यात ते त्याच्या हाताखालच्या विद्यार्थ्यांना बरोबर शिकवीत नाहीत. मग शिक्षण पाहा नाही तर पैसा पाहा अशी अवस्था होते शाळेची. तसेच काही शिक्षक विद्यार्थी हित पाहतात आणि ते पाहात असतांना केवळ शिक्षण पाहा नाही तर पैसा. यातूनच वाद निर्माण होतात. ते वाद एवढे शिगेला पोहोचतात की अशा शाळेत विद्यार्थ्यांना नीट शिक्षण मिळत नाही. अशावेळेस शाळा हे कुटुंब राहात नाही. ते कुटुंब नष्ट होतं. एकमेकांच्या कुरापती काढल्या जातात. शाळेला छावणीचं रुप प्राप्त होतं व एकमेकांचे हेवेदावे करीत शाळेतच रामायण, महाभारत सुरु होतं. शिकविण्याची मुल्ये बाजूला पडतात. याचा परिणाम हा होतो की हेच वाद पालकांना दिसतात व ते पालक कालांतरानं आपली मुलं शाळेत टाकत नाहीत. ते आपली मुलं शाळेतून काढून घेतात व दुसरीकडे नेवून टाकतात. ज्या शाळेत वाद होत नाहीत.


विशेष म्हणजे शाळा हे आपले कुटुंब असून त्या ठिकाणी कोणत्याच गोष्टीवरुन वाद होवू नयेत. पैशावरुन तर अजिबात वाद होवू नयेत. त्यातून केवळ पैसा कमविण्याचा उद्देश नसावा. समजा वाद झालेच तर ते वाद सामोपचाराच्या माध्यमातून सोडवले जावेत. कर्मचाऱ्यांनाही सन्मान द्यावा. त्यांना कामगार समजू नये तर आपल्या कुटुंबातील एक भाग समजावे. जेणेकरुन शाळा वाढेल. शाळेची किर्ती दुरदूर जाईल. त्यातच मराठी शाळाही टिकतीलच. वाढतील व पटसंख्याही वाढेल. हे तेवढंच खरं.

**

# ‘धुरंधर’ नेता हरपला..

**शिवाजी चौगुले**

अजितदादा पवारांचा देह गुरुवारी अनंतात विलीन झाला. मृत्यू अटळ असतो; तो देहाला संपवतो, व्यक्तिमत्त्वाला नाही. अजितदादा पवार हे त्याच वर्गातले व्यक्तिमत्त्व होते. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची, विचारांची धार आणि कृतींचा ठसा काळाच्या गर्तेत विरून जाणारा नाही. अजितदादांसारखी माणसं देहाने जातात, पण त्यांच्या गुणांनी समाजमनात कायमचं स्थान मिळवलेलं असतं. दादांमधील सर्वात आधी जाणवणारा गुण म्हणजे निर्भीडपणा. परिस्थिती कितीही प्रतिकूल असो, मत कितीही विवादास्पद ठरणारं असो, त्यांनी स्पष्ट भूमिका मांडण्याचा मार्ग कधी सोडला नाही. राजकारणातील गोलमोल भाषा आणि सुरक्षित अंतर ठेवण्याची सवय त्यांनी अंगीकारली नाही. जे वाटलं ते बोलण्याचं आणि जे योग्य वाटलं ते करण्याचं धाडस त्यांनी आयुष्यभर जपलं. हा निर्भीडपणा अनंतात विलीन होणारा नाही; तो पुढच्या पिढ्यांसाठी धैर्याचा मापदंड ठरतो. त्यांच्यातील दुसरा अविनाशी गुण म्हणजे कामाचा प्रचंड आग्रह. आश्वासनं देणं सोपं असतं, पण ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी लागणारी चिकाटी दुर्मीळ असते. अजितदादांनी कामाला शब्दांपेक्षा वरचं स्थान दिलं. योजना कागदावरच थांबू नयेत, त्यांनी जनतेच्या जीवनात बदल घडावा, ही त्यांची ठाम भूमिका होती. निर्णय घेतल्यानंतर त्याची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी ठेवणारा नेता म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती.



सामान्य माणसाशी असलेली त्यांची नाळ हादेखील अनंतात न विलीन होणारा गुण आहे. ते लोकांमध्ये वावरले, त्यांची भाषा ऐकली आणि त्यांच्या प्रश्नांकडे मनापासून पाहिलं. औपचारिकतेपेक्षा आपुलकी आणि दिखाव्यापेक्षा प्रामाणिकपणा यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच ते ‘आपला माणूस’ म्हणून अनेकांच्या मनात घर करून राहिले. चुका मान्य करण्याची तयारी आणि त्यातून शिकण्याची वृत्ती हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू होता. परिपूर्णतेचा आव आणण्यापेक्षा आत्मपरीक्षणावर त्यांनी भर दिला. ही प्रामाणिकता आजच्या सार्वजनिक जीवनात दुर्मिळ होत चालली असली, तरी दादांच्या कार्यातून ती कायम स्मरणात राहील. अजितदादा पवारांचा देह अनंतात विलीन झाला असला, तरी त्यांचा निर्भीडपणा, कामावरील निष्ठा, स्पष्टवक्तेपणा आणि सामान्य माणसाशी असलेली नाळ अनंतात कधीच विलीन होऊ शकत नाही. हे गुण काळाच्या प्रवाहात अधिक ठळक होत जातील आणि समाजाला दिशा देणाऱ्या मूल्यांसारखे सदैव जिवंत राहतील. खरं तर, मृत्यू माणसाला थांबवतो; त्याच्या आयुष्याकडे पाहण्याचा हक्क मात्र जे जिवंत आहेत, त्यांच्या हाती सोपवतो. अशा वेळी केवळ गुणांची उजळणी करून थांबणं पुरेसं ठरत नाही. माणूस मोठा ठरतो तो आपल्या चुका ओळखून, त्या मागे टाकण्याची समाजाची तयारी किती आहे यावर. म्हणूनच आता अजित पवारांनी केलेल्या चुकाही अनंतात विलीन होणं गरजेचं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट ही त्यांच्या राजकीय आयुष्यातील सर्वात मोठी चूक मानली जाते. ही फूट पक्षातील होतीच; शिवाय ती एका विचारपरंपरेची, विश्वासाची आणि शरद पवारांनी उभ्या केलेल्या राजकीय संस्कृतीची होती.


सत्येच्या गणितात घेतलेला तो निर्णय क्षणिक राजकीय लाभ देणारा ठरला असला, तरी दीर्घकाळात पक्षाला, कार्यकर्त्यांना आणि राज्याच्या राजकारणाला खोल जखम देणारा ठरला. याची जाणीव स्वतः दादांनाही शेवटच्या टप्प्यात होत गेली होती. त्याचीच साक्ष म्हणजे मृत्यूच्या काही दिवस आधी महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांनी पुन्हा एकदा शरद पवारांचे बोट धरत सुरू केलेला नवा अध्याय. तो अध्याय म्हणजे व्यापक राजकीय संकेत होते. तुटलेली नाळ जोडण्याची, दुभंगलेली मने एकत्र आणण्याची आणि राष्ट्रवादी काँग्रेसला पुन्हा तिच्या मूळ विचारधारेत उभं करण्याची ती ठाम सुरुवात होती. राज्याच्या राजकारणातही हा बदल दिसावा, अशी अनेक जुन्या जाणत्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची इच्छा होती. पडद्यामागे प्रयत्न सुरू होते, संवादाचे धागे पुन्हा गुंफले जात होते. मतभेदांपेक्षा मोठा पक्ष आणि व्यक्तींपेक्षा मोठी परंपरा जपण्याची तयारी हळूहळू आकार घेत होती. मात्र दादांच्या अचानक जाण्याने ही प्रक्रिया मध्येच थांबली. इच्छा अपूर्ण राहिली आणि त्या अपूर्णतेची जाणीव आज अधिक तीव्रतेने बोचत आहे. पण मृत्यूने एखादी प्रक्रिया थांबते, दिशा नाही. अजित पवारांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून काढण्याचा मार्ग म्हणजे त्यांनी केलेल्या चुका दुरुस्त करणं. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणं, कटुता मागे टाकणं आणि पक्षाला पुन्हा संघटित बळ देणं, हीच त्या चुकांच्या विलीनीकरणाची खरी सुरुवात ठरू शकते. दादांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली द्यायची असेल, तर त्यांच्या नावावर राजकीय भांडवल उभारण्यापेक्षा त्यांनी अखेरच्या काळात दाखवलेल्या समजूतदारपणाला पुढे नेणं गरजेचं आहे. एकत्र येऊन राष्ट्रवादीला पुन्हा उभं करणं, शरद पवारांनी रुजवलेली मूल्यं आणि संघर्षाची परंपरा जपणं आणि वैयक्तिक अहंकारापेक्षा पक्षहित व सामान्य माणसांना प्राधान्य देणं हीच ती वाट आहे, जी अजित पवारांच्या आयुष्याच्या अखेरच्या अध्यायाशी प्रामाणिक ठरेल. तेव्हाच म्हणता येईल की देहाबरोबर चुकाही विलीन झाल्या...भावपूर्ण श्रद्धांजली दादा..!! **

## गजलची विलक्षण किमया

# शब्द झाले सप्तरंगी

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

“शब्द झाले सप्तरंगी“, हा डॉ. दिलीप पांढरपट्टे यांचा गजलसंग्रह, नवी मुंबई येथील अभिव्यक्ती प्रकाशनने प्रकाशित केला आहे. जानेवारी २०२३मध्ये या पुस्तकाची चौथी आवृत्ती प्रकाशित झाली. पहिल्या आवृत्तीसाठी सुरेश भट यांची प्रस्तावना, “हा पहा लागला अर्थ बोलावया...” या शीर्षकान्वये वाचावयास मिळते. “या गजलसंग्रहात आशा, निराशा, चीड, प्रेम, उपहास इत्यादिंचे रंगच रंग आहेत. कधी काळा, तर कधी गुलाबी तर कधी धगधगत्या निखाऱ्याचा लालभडक रंग! प्रत्यक्ष जीवनात जे जगता येत नाही, जे दहाजणांसमोर बोलता येत नाही, जे डोळे, ओठ शिवून मुकाट्याने गपगार पहावे लागते, ते सर्व काही आम्ही कवी मंडळी आपल्या काव्यात कागदावरील शब्दांनी व्यक्त करीत असतो.” असे सुरेश भट म्हणतात. दिलीप पांढरपट्टे यांनी इतर काव्यप्रकार जरूर हाताळावेत असेही त्यांना वाटते. भीमराव पांचाळे, डॉ. राम पंडित, यशवंत देव यांनीही या गजल संग्रहाला लिखित स्वरूपात शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. दिलीप यांनीही आपले मनोगत व्यक्त केले आहे. या गजलसंग्रहात एकूण ९२ गजल समाविष्ट आहेत. पुस्तकाचे रंगीत आणि देखणे मुखपृष्ठ राज धनस्कर यांनी साकारले आहे.




मराठी गजल ही उर्दूप्रमाणे विशिष्ट नियमांनुसार रचलेली असते. प्रत्येक शेर (कडवे) स्वतंत्र विचार मांडतो. गजलमध्ये प्रेम, वेदना, जीवन, समाज, तत्त्वज्ञान, सामाजिक प्रश्न असे अनेक विषय हाताळलेले असतात. सामान्यपणे प्रत्येक शेर दोन ओळींचा असतो. पहिल्या शेराला ‘मतला’ असे म्हणतात. यामध्ये काफिया आणि रदीफ यांची सुरुवात होते. शेवटचा शेर ‘मकता’, यामध्ये कवी आपले टोपणनाव वापरतो. गजलमधील प्रत्येक शेर स्वतंत्र अर्थ मांडतो.

मुक्तकमध्ये स्वतंत्र शेर (कडवे) एकच विचार मांडणारा, दोन ओळींचा कविता अंश असतो. ‘रुबाई’ ही चार ओळींची कविता असते. पहिल्या, दुसऱ्या आणि चौथ्या ओळीत यमक साधलेले असते. तिसरी ओळ भिन्न असते. त्यामध्ये जीवनातील विविध विषय मांडलेले असतात. रुबाईचा उगम फारसी साहित्यात झाला आणि मराठीतही ती आता रुळली आहे.

सुरुवातीच्या मुक्तकमध्ये दिलीप यांनी आपल्या जीवन प्रवासाची जणु नोंद केली आहे.

**नसे फक्त हा सोहळा अक्षरांचा**
**नसे बहर हा फक्त पाना-फुलांचा**
**मरुभूमि ही जीवघेण्या व्यथांची**
**गजल हा असे कारवा वेदनांचा**

जीवनाशी जुंपली आता लढाई... मध्ये दिलीप शेवटी म्हणतात,

**जे प्रजेला भाकरी देऊ न शकले**
**मारती ते ई-गव्हर्नन्सची बढाई**
**मानली नाही अजुन मी हार माझी**
**मी तुझ्याहुन, वेदने आहे सवाई**

कवीला आपल्या काव्य गुणांची यथार्थ जाणीव आहे.ते पुढील रुबाईमध्ये नेमकेपणाने व्यक्त होते आहे.

पटली न कधीही तुज जनरीत, दिलीप जगलास अनोख्या तू धुंदीत, दिलीप हे आज जरी लोक डिवचतात तुला, गातील उद्या तेच तुझे गीत, दिलीप

दिलीप यांचे गजल प्रेम “कोण जाणे काय झाले...” मध्ये नेमकेपणाने व्यक्त होत आहे.

शेवटी मी या जगाचे काय नेले?
बस! गजल होती सुळावर सोबतीला

हसू उमटले दुःख भोगता...मध्ये शेवटच्या दोन कडव्यात लिहितात..

**शब्द दिला होतास मला तू शतजन्मांचा**
**विसरलीस पण बघता बघता, गंमत आहे**
**मी जगण्याचा अर्थ जन्मभर शोधत होतो**
**तो सापडला मरता मरता, गंमत आहे**

मरताना जगण्याचा अर्थ समजल्याने, गजलकाराला गंमत वाटते आहे, मात्र मृत्यूची भीती वाटत नाही, हे विशेष!

साने गुरुजींबद्दल, “तो तर हृदयातील उन्हाळा...” या गजलेमध्ये कवी शेवटी लिहितात,

**बरबटलेली मने आमची,**
**त्याने धुतली अश्रुजलाने**
**भरकटलेल्या नौकांसाठी**
**तो तर एक किनारा होता**
**रमला-फुलला फुला-मुलांतच,**
**रुसला का मग आयुष्यावर?**
**समजू आता असेच आपण -**
**देवाला तो प्यारा होता**

आज-काल पाळतो न.. मध्ये दिलीप लिहितात...

आजकाल पाळतो न एकही प्रघात मी दूर सावल्या करून हिंडतो उन्हात मी आणि शेवटी..

साथ सोडुनी जुनी, निघून यार चालले चालतो अता असा घरातल्या घरात मी आई असते श्रावण.. मध्ये दिलीप यांनी आईची महानता उत्तम प्रकारे मांडली आहे.

आई असते श्रावण अविरत रिमझिमणारा तप्त जिवाची तगमग सारी थांबवणारा आणि शेवटी...

आई म्हणजे काय? मला इतकेच उमगले...
एक दिवा जळणारा आणिक तळमळणारा
“कवटाळलेस तेव्हा”मध्ये प्रेयसी म्हणते,
विझले कधीच सारे-सरणातले निखारे
तू सूत्र जीवनाचे अन् सांगतोस आता
तू बोललास म्हणुनी मी झुंजले जगाशी प्रस्ताव का तहाचा तू मांडतोस आता?

दिलीप यांचे पुढील मुक्तक पहा..

**सुर सनईचा- तशी आली दिवाळी**
**सप्तरंगी ही पुन्हा न्हाली दिवाळी**
**काळजाची काजळी जाईल आता**
**दीप आशेचा पुन्हा झाली दिवाळी**

अलविदा म्हणण्यास... या गजलेत दिलीप म्हणतात..

‘अलविदा’ म्हणण्यास मी वळणार नाही दुःख शब्दांनी असे टळणार नाही

शेवटचा शेर पहा..

**ये, चितेवर चुंबने ठेवून जा तू**
**प्रेत हे माझे तसे जळणार नाही..**

दिलीप पांढरपट्टे यांच्या या गजल संग्रहामध्ये प्रामुख्याने जीवनातील, वास्तव अनुभव परखडपणे मांडले गेले आहेत. ते वाचताना रसिक वाचक अंतर्मुख होतो. गजल प्रेमातून दिलीप यांनी उर्दूचा उत्तम अभ्यास करून, त्यामध्येही त्यांचे गजल लेखन सुरू आहे. विविध प्रकारचे, अन्य गद्य साहित्यही त्यांनी वेळोवेळी लिहिले आहे. त्यांच्या सचित्र परिचयाबरोबरच, त्यांच्या प्रकाशित पुस्तकांची माहितीही या पुस्तकात दिली आहे. रसिकांना “शब्द झाले सप्तरंगी” हा गजल संग्रह निश्चितच आवडेल असा आहे. **

पुस्तकाचे नाव : शब्द झाले सप्तरंगी
गजलकार : डॉ.दिलीप पांढरपट्टे
९८२१०७५५४२
प्रकाशक :अभिव्यक्ती प्रकाशन,
नेरूळ (प), नवी मुंबई ४००७६६
पहिली आवृत्ती : डिसेंबर २००१
चौथी आवृत्ती : जानेवारी २०२३
पृष्ठे : ९२. मूल्य : रु. २००/-

# उमदा राजकारणी, कठोर प्रशासकाचा अस्त

**राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या मृत्युमुळे राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली. धडाडीचा, कार्यक्षम आणि शिस्तबद्ध नेता म्हणून लौकिक असलेले अजित पवार आगामी काळात राज्याच्या राजकारणात मोठी भूमिका बजावू शकले असते. त्यांच्या अकाली मृत्युमुळे राज्याने एक उमदा राजकारणी आणि कठोर प्रशासक गमावला आहे. या लोकनेत्याला वाहिलेली श्रद्धांजली.**



**अशोक चौसाळकर**

राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा हंगाम सुरू होत असतानाच एक वाईट बातमी येऊन धडकली आणि राज्यातील राजकारण्यांसह जनतेलाही मोठा धक्का बसला. या निवडणुकांच्या प्रचाराचा धडाका सुरू करण्यासाठी सर्व पक्ष सज्ज होत असताना, सकाळी लवकर उठून कामाला सुरूवात करण्याची ख्याती असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार ही ख्याती जपत बारामतीमध्ये पहिली प्रचारसभा घेण्यासाठी मुंबईहून विमानाने पहाटेच बारामतीला जायला निघाले. प्रचारसभेची वेळ सकाळी साडेनऊची होती. पण विमानाच्या ‘लँडिंग’मध्ये काही तरी तांत्रिक समस्या निर्माण झाली आणि हे विमान बारामतीजवळच एका दरीत कोसळले. हे विमान ५०० फूट उंचीवरून कोसळल्यामुळे कोणी वाचण्याची शक्यता फारच धूसर होती. त्यानुसार विमानात बसलेल्या अजित पवार यांच्यासह पाचजणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुढील तपासानंतर अपघाताचे नेमके कारण समोर येईल, हा अपघात टाळता आला असता का, यावर ऊहापोह होईल, पण या अपघातात राज्याने एक उमदे नेतृत्व गमावले आहे, हे वास्तव बदलू शकणार नाही. अजित पवार यांना उभा महाराष्ट्र एक उमदे व्यक्तीमत्व, शिस्तबद्ध राजकारणी आणि झटून काम करणारा नेता म्हणून ओळखतो. काका शरद पवार यांच्या छत्रछायेत राजकारणाचे धडे गिरवताना त्यांनी पक्षात, प्रशासनात आणि राज्यातील जनतेच्या मनात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले होते. १९९१ च्या विधानसभा निवणुकीमध्ये ते सर्वप्रथम आमदार म्हणून निवडून आले आणि त्यांनतर आजपर्यंत सलग सात वेळा बारामतीकरांनी त्यांना आमदार म्हणून निवडून दिले. त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्रीपद आणि अर्थमंत्रीपद अनेकदा भूषवले.

राज्याच्या राजकारणामध्ये गेली २५ वर्षे अजित पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कर्तबगार मंत्री, कठोर प्रशासक म्हणून ओळखले जाणारे अजित पवार यांनी आर्थिक शिस्त अंगी बाणवली होती. महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा आवाका त्यांच्या लक्षात आला होता. त्या जोरावर त्यांनी राज्याच्या अर्थ मंत्रालयाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणामध्ये अजित पवार यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांनी शरद पवार यांच्यापासून वेगळे होऊन भारतीय जनता पक्षाशी युती केली तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे वैचारिक वेगळेपण गमावले नाही. आपली निष्ठा शाहू-फुले-आंबेडकर यांच्याशी आहे हे त्यांनी वेळोवेळी स्पष्ट केले. निवडणुकांमध्ये जय-पराजय होत असतात, पण अजित पवार यांच्याकडे नेहमीच जनाधार होता.

गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी चांगले यश मिळवले. या निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी मिळून (शरद पवार गट आणि अजित पवार गट) एकूण २१.५ टक्के मते मिळवली होती, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. पुढे या दोन्ही पक्षांचे विलीनीकरण झाल्यानंतर २० ते २१ टक्के लोकांचा पाठिंबा असणारा हा पक्ष असणार होता. पुढील काळात महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार अतिशय महत्त्वाची भूमिका बजावणार होते. पण दुर्दैवाने त्यांचा अकाली मृत्यू झाल्याने या सर्व शक्यता कागदावरच राहिल्या.

देशाच्या आणि राज्याच्या राजकारणामध्ये विमान आणि इतर अपघातांमध्ये मृत्यू होणाऱ्या अनेक नेत्यांमध्ये अजित पवार यांचा समावेश झाला आहे. या नेत्यांच्या मृत्यूंमुळे राजकारणाची दिशा बदलल्याचे आपण पाहिले आहे. संजय गांधी, माधवराव शिंदे, आंध्र प्रदेशचे कर्तबगार माजी मुख्यमंत्री राजशेखर रेड्डी यांचे मृत्यू विमान अपघातांमध्येच झाले होते. तत्कालीन केंद्रिय कृषीमंत्री आणि महाराष्ट्रचे माजी उपमुख्यमंत्री गोपिनाथ मुंडे यांचा मृत्यू वाहन अपघातात झाला होता. या सर्वांच्या मृत्यूनंतर त्या त्या राज्याच्या किंवा देशाच्या राजकारणात बदल झाल्याचे आपण पाहिले आहे. आता अजित पवार यांच्या मृत्यूनंतर राज्याच्या राजकारणाची दिशाही बदलण्याची चिन्हे आहेत. अलिकडच्या काळात अजित पवार आणि शरद पवार यांची जवळीक वाढत होती. राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्षांची युती झाल्याचे आपण पाहिले. आता जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठीही हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत. या निमित्ताने अजित पवार भारतीय जनता पक्षाशी असलेल्या युतीतून बाहेर पडून काकांबरोबर जाणार का, असा प्रश्न पुढे येत होता. अर्थात दोन्ही राष्ट्रवादी पक्षांची जवळीक वाढत असली तरी अजित पवार युतीतून बाहेर पडले असते, असे मला तरी वाटत नाही. युतीबरोबर राहूनही ते स्वत:चे वेगळे अस्तित्व टिकवणार होते आणि त्याच वेळी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीशी जवळीक राखणार होते.

अजित पवार यांची प्रशासनावर घट्ट पकड होती याची अनेक उदाहरणे दिली जातात. त्याचबरोबर एखाद्याला शब्द दिला की तो पूर्ण करण्यासाठी ते जातीने लक्ष घालून काम करून द्यायचे, याचेही अनेक किस्से सांगितले जातात. असाच एक किस्सा मला आठवतो. अजित पवार यांचे महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूरच्या शहाजी कॉलेजमध्ये झाले होते. त्यामुळे त्यांचे कोल्हापूरवर आणि कॉलेजजवळ असलेल्या रंकाळा तलावावर विशेष प्रम होते. मागे एकदा रंकाळा तलावात केंजाळ नावाची वनस्पती मोठ्या प्रमाणावर वाढली होती. ती पाहिल्यावर त्यांना वाईट वाटले आणि त्यानी संबंधितांना हा तलाव दोन दिवसांमध्ये स्वच्छ करून देतो, असे आश्वासन दिले. त्यानंतर त्यांनी खरोखरच सर्व यंत्रणा कामाला लावून दोन दिवसांमध्ये तलाव स्वच्छ करून दिला. अजित पवार हे एक धडाडीचे नेते होते, सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये ते सहज मिसळत होते. त्यांचा कोणताही अभिजनवादी दृष्टीकोन नव्हता. त्यामुळेच ते जनमानसात लोकप्रिय होते. यासंदर्भातील पवार कुटुंबाची परंपरा त्यांनी जपली होती.

गेल्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी पक्षांना मिळून २१.५ टक्के मते खेचता आली होती. मग सत्तेत राहून स्वत:चे वेगळेपण कायम ठेऊन (शरद पवार यांच्या पक्षाशी जवळीक साधून) ही २१ टक्के मते आपल्याकडे कशी ठेवता येतील याचा विचार अजित पवार करत होते. पुढील काळात त्यांचे भारतीय जनता पक्षाशी वाद झाले असते तर ते युतीतून बाहेरही पडले असते. पण लगेच युतीतून बाहेर पडण्याचा त्यांचा विचार असेल, असे मला वाटत नाही. अजित पवारांच्या नेतृत्वाखाली किमान राज्यात तरी भारतीय जनता पक्षापुढे आव्हान निर्माण करू शकेल असा पक्ष निर्माण होऊ शकला असता. आता दोन्ही राष्ट्रवादी पक्षांसमोर एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शरद पवार यांचे वय बरेच झाले आहे. अजूनही कार्यरत असले तरी आता ते पूर्वीप्रमाणे तडफेने काम करू शकत नाहीत, हे सत्य आहे. त्यातच अजित पवार यांच्या मृत्यूनंतर त्यांचा पक्षही नेतृत्वहीन झाला आहे.

राज्यातल्या या महत्त्वाच्या पक्षापुढे आता नवे, सक्षम नेतृत्व निर्माण करण्याचे आव्हान आहे. अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्युमुळे आता कदाचित दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू होईल. त्यात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुढील काळात सरकारमध्ये रहायचे की नाही याबाबत सुरु झालेली चर्चा. पण माझ्या मते हा पक्ष सरकारमध्ये राहील. त्यानंतरचा प्रश्न म्हणजे अजित पवार यांच्या जागी योग्य नेतृत्व देऊ शकेल असा सर्वमान्य नेता शोधणे. अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याकडे नेतृत्व जाते की आणखी कोणाकडे, हे आता पहावे लागणार आहे.

नजिकच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये फार मोठे राजकीय बदल होणार नसले तरी पुढील काळात नक्कीच मोठे बदल पहायला मिळू शकतात. पुढील काळात ‘पॉलिटिकल रिअलाईनमेंट्स’ होण्याची शक्यता असून महायुतीतील अंतर्गत संघर्ष आणि स्वत:चे अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने काय भूमिका घ्यावी यावर त्या पक्षाच्या नेत्यांमध्ये होणारे विचारमंथन आणि त्यातून निर्माण होणारे नवे आडाखे हे मुद्दे हळूहळू स्पष्ट होत जातील. अर्थात त्यासाठी आपल्याला थोडी वाट पहावी लागेल. अजित पवार यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या पक्षात आणि राज्याच्या राजकारणात एकूणच मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढे काय घडामोडी घडतात यावर बरेचसे राजकीय विश्लेषक लक्ष ठेऊन आहेत. **

# निवडक




## मुंबईची दिल्लीवर आघाडी

**मुंबई :** कर्णधार सिद्धेश लाडच्या संयमी आणि आक्रमक शतकाच्या जोरावर तसेच सुवेद पारकर आणि मुशीर खानच्या मोलाच्या योगदानामुळे मुंबईने रणजी ट्रॉफी एलीट गट 'ड' सामन्यात दिल्लीविरुद्ध पहिल्या डावात आपली बाजू भक्कम केली आहे. शुक्रवारच्या खेळाअखेर मुंबईने पाच विकेट गमावून २६६ धावा केल्या असून दिल्लीवर ४५ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली आहे. गुरुवारी १ बाद १३ धावांपासून पुढे खेळ सुरू करताना मुंबईची सुरुवात डळमळीत झाली. सकाळच्या सत्रात तुषार देशपांडे (१) आणि अखिल हेरवाडकर (१२) माघारी परतल्याने संघ अडचणीत सापडला. मात्र अशा संकटक्षणी मुशीर खान आणि कर्णधार सिद्धेश लाड यांनी संयम दाखवत डाव सावरला. चौथ्या विकेटसाठी ६३ धावांची उपयुक्त भागीदारी रचली. ४२ व्या षटकात राहुल चौधरीने मुशीर खानला बाद करत ही भागीदारी तोडली. मुशीरने ११४ चेंडूंमध्ये सात चौकारांसह ५७ धावांची झुंजार खेळी केली.

## कट्टर प्रतिस्पर्ध्यांमध्ये लढाई

**नवी दिल्ली :** भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यामध्ये अंडर-१९ विश्व चषकाचा सामना सुरू व्हायला काही तास शिल्लक राहिले आहेत. या सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा असणार आहे, सेमीफायनलचे तीन संघ निश्चित झाले आहेत. आता फक्त एका संघासाठी जागा शिल्लक आहे. भारताच्या संघाने एकही सामना गमावलेला नाही. भारत विरुद्ध पाकिस्तान अंडर-१९ विश्व



चषकाचाबहुप्रतिक्षित सामना रविवार, १ फेब्रुवारी रोजी खेळला जाणार आहे. सहसा अंडर-१९ विश्व चषक स्पर्धांमध्ये, भारत आणि पाकिस्तान संघ एकाच गटात असतात आणि चाहत्यांना सुरुवातीच्या टप्प्यातच भारत विरुद्ध पाकिस्तान सामना पाहण्याची संधी मिळते. अंडर-१९ विश्व चषकामध्ये, भारत आणि पाकिस्तान संघांना वेगवेगळ्या गटात ठेवण्यात आले होते, आता सुपर-६ मध्ये या दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये ही लढाई खेळली जाणार आहे. भारत विरुद्ध पाकिस्तानचा हा सामना उत्साहाने भरलेला असेल, या दोन्ही संघांपैकी फक्त एकच संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरेल. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि अफगाणिस्तान यांनी आधीच विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आहे. भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याद्वारे चौथा संघ निश्चित केला जाईल. भारतात विजय मिळवल्यास थेट उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल.

## राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी पात्र

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्यावतीने डेरवण येथील क्रीडासंकुलात नुकत्याच झालेल्या ॲथलेटिक्स सबज्युनिअर जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत जिल्ह्यातील प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना पदक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेत केदार चाळके, रियांश उतेकर, आरूष पाटील. वैदही आरवत, ईशानी खारवर, वैष्णवी पडेलकर. १०० मी. धावणे - श्लोक पारकर, रियांश उतेकर, रूपेश शेळके, वैदही आरवत, वैष्णवी पडेलकर, ईशानी खारवर. लांब उडी-सुमित फाटक, नक्ष धावडे, श्लोक पारकर, काव्या खसासे, संजना चव्हाण. १० वर्षाखालील मुले व मुली ५० मी. धावणे श्रेयस शिखरे, गोवर्धन राजपकर, पारोम चौधरी, अन्वी जाधव, अवनी भेकट. १०० मी. धावणे - श्लोक वळवी, आराध्य ठसाळे, अन्वी जाधव, देविका शेट्टी, युती तोडणकर. लांब उडी - आराध्य ठसाळे, श्लोक पवार, सोहम जंगम, अवनी भेकट, देविका शेट्टी, स्वरा धापसे. गोळाफेक- स्वराज मोरे, ध्रुव किंजळकर, श्लोक पवार, स्वरा पाष्टे, काव्या खेडेकर, आरोही हांजे. १२ वर्षाखालील मुले व मुली ६० मी. धावणे - रेहान बनाटी, रौनक कदम, स्वामी गुरव, संचिता वरवटकर, ऋषिता धुर्वा, मुक्ता सुतार, संदेश शिंदे, देवांश मोरे, विहान मोहिते. अंशिका राणे, संचिता वरवटकर, मुक्ता सुतार. लांब उडी-श्रेयस शिखरे, दर्शन म्हालीम, रुद्र बोलाडे, मुक्ता सुतार, रिया तिवारी, श्रेया होळकर आदी विजेते ठरले.

## 'पॉवरलिफ्टिंग'मध्ये हीना द्वितीय

**सावंतवाडी :** कोल्हापूर विभाग पॉवरलिफ्टिंग असोसिएशनतर्फे आयोजित शालेय विभागीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत स्टेपिंग स्टोन ग्लोबल स्कूलची विद्यार्थिनी हीना सारंग हिने उल्लेखनीय यश प्राप्त केले. ४० किलो वजन गटात तिने ५५ किलो वजन उचलून द्वितीय क्रमांक पटकावला. तिची राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या पालकांसह प्रशिक्षक, सहाध्यायी विद्यार्थ्यांनी तिचे कौतुक केले आहे. तसेच शाळेचे संचालक रूजुल पाटणकर व मुख्याध्यापिका प्राची साळगावकर यांनीही तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कुंभारखाणीत शालेय मॅरेथॉन स्पर्धा

**सावर्डे :** संगमेश्वर तालुक्यातील कुंभारखाणी बुद्रुक येथील ग्रामोत्कर्ष संघ मुंबई, ग्रामपंचायत व क्रीडा मंडळातर्फे १ फेब्रुवारीला सकाळी आठ वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी ङ्गएक धाव शिक्षणासाठीफ या शीर्षकाखाली शालेय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा आठ ते सोळा वयोगटातील मुले व मुलींसाठी आहे. स्पर्धा कुचांबे, राजिवली मुरडव, आरवली, असुर्डे, कुटरे, आंबतखोल, नांदगाव, येगाव, तळवडे परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आहे. स्पर्धेत आठ ते दहा वयोगटासाठी पाचशे मीटर, दहा ते बारा वयोगटासाठी एक किलोमीटर, बारा ते चौदा वयोगटासाठी दोन किलोमीटर व चौदा ते सोळा वयोगटासाठी तीन किलोमीटर धावण्यासाठी अंतर असणार आहे. विजेत्यांना रोख रक्कम व पदक देण्यात येणार आहे. स्पर्धेच्या नियोजनासाठी शालेय समितीचे अध्यक्ष राजेंद्र कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

# आठ सहभागी नवोदित देशांचा रोमांचक प्रवास




टी ट्वेंटी विश्वचषक



विनायक दळवी

भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये आठ सहयोगी राष्ट्रे स्पर्धा करतील. स्पर्धेपर्यंतचा त्यांचा प्रवास आणि त्यांचा खेळ पाहण्यासारख्या काही संभाव्य खेळाडूंबद्दल. ज्याची सुरुवात पदार्पण करणाऱ्या संघांपासून करूया.

**इटली :** ज्या काळात त्यांच्या फुटबॉलपटूंना विश्वचषकात स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, त्या काळात इटालियन क्रिकेट नवीन उंची गाठत आहे आणि या स्पर्धेत प्रथमच सहभागी होणार आहे.

त्यांच्या प्रवासाची सुरुवात युरोपियन उप-प्रादेशिक पात्रतेच्या फेरीत झाली, जिथे त्यांनी फ्रान्स, आयल ऑफ मॅन, लक्झेंबर्ग आणि तुर्की यांचा समावेश असलेल्या गटात अव्वल स्थान पटकावले आणि त्यानंतर मायदेशात अंतिम सामन्यात रोमानियाला हरवले. त्यानंतर त्यांनी आयसीसी पुरुष टी२० विश्वचषक युरोप प्रादेशिक पात्रता फेरीतून यश मिळवले, जिथे अंतिम सामन्यात नेदरलँड्सवर मिळवलेल्या निसटत्या विजयामुळे इटलीने जर्सीला मागे टाकून मुख्य स्पर्धेत स्थान मिळवले. वेन मॅडसन संघाचे नेतृत्व करेल, ज्यात दक्षिण आफ्रिकेकडून १९ सामने खेळलेल्या जे जे स्मट्सचा समावेश आहे. इटलीला इंग्लंड, नेपाळ, स्कॉटलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यासोबत गट 'सी'मध्ये ठेवण्यात आले आहे.

**कॅनडा :** यापूर्वी तीन आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषकांमध्ये खेळलेल्या कॅनडाने २०२४ मध्ये आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकात पदार्पण केले, जिथे त्यांनी पूर्ण सदस्य असलेल्या आयर्लंडवर एक उल्लेखनीय विजय मिळवला.

ते पुन्हा परत आले आहेत आणि आयसीसी पुरुष टी२० विश्वचषक अमेरिका प्रादेशिक पात्रता फेरीत सहापैकी सहा सामने जिंकून अफगाणिस्तान, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि यूएई यांच्यासोबत गट 'डी'मध्ये आहेत. अष्टपैलू शिवम शर्माने ११ बळी घेऊन स्पर्धेत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज म्हणून स्थान मिळवले आणि तो एक पाहण्यासारखा खेळाडू आहे. त्याचप्रमाणे २२ वर्षीय कर्णधार दिलप्रीत बाजवा देखील आपले लक्ष वेधून घेणारा खेळाडू आहे. स्पर्धेपूर्वी बोलताना मुख्य प्रशिक्षक इंग्लेटन लिबर्ड म्हणाले: पात्रता फेरीदरम्यान खेळाडूंनी कठोर परिश्रम करून खेळ करत, केवळ विजय मिळवण्यावरच लक्ष केंद्रित केले.

**नामिबिया :** आफ्रिकेच्या प्रादेशिक पात्रता फेरीत झिम्बाब्वेसोबत पात्र ठरलेल्या दोन संघांपैकी एक म्हणून नामिबिया आयसीसी पुरुष टी२० विश्वचषकात सलग चौथ्यांदा सहभागी होणार आहे.

गटातील तीनही सामने जिंकल्यानंतर, जेजे स्मिथने टांझानियाविरुद्धच्या महत्त्वपूर्ण उपांत्य फेरीतील विजयात उत्कृष्ट कामगिरी केली, ज्यामुळे नामिबियाचे स्थान निश्चित झाले. या अष्टपैलू खेळाडूने प्रथम नाबाद ६१ धावा केल्या आणि नंतर गोलंदाजी करताना १६ धावांत तीन बळी घेतले. नामिबियाने अंतिम सामना झिम्बाब्वेकडून गमावला, परंतु त्यांचे स्थान निश्चित झाले होते आणि त्यांच्या अजिंक्य कर्णधार गेरहार्ड इरास्मसच्या नेतृत्वाखाली ते पुन्हा एकदा मैदानात उतरतील. गेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकातील संघातील नऊ खेळाडू परतले आहेत, ज्यात जान निकोल, लॉफ्टी-ईटन पात्रता फेरीत ६.४० च्या सरासरीने १० बळी घेऊन मिळवलेला आपला उत्कृष्ट फॉर्म पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करेल.

**नेपाळ :** नेपाळने आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक आशिया-ईएपी प्रादेशिक पात्रता फेरीत अपराजित राहून आगेकूच केली. त्यांनी गट टप्प्यात जपान आणि कुवेतचा पराभव केला आणि सुपर सिक्समध्ये अव्वल स्थान पटकावले.अटीतटीचे सामने खेळणे हे नेपाळसाठी नित्याचे झाले आहे. पात्रता स्पर्धेत त्यांनी दोन चुरशीच्या सामन्यांमध्ये यूएईला एका धावेने आणि कतारला पाच धावांनी हरवले. २३ वर्षीय रोहित पौडेल भारत आणि श्रीलंकेत संघाचे नेतृत्व करेल. त्याला उपकर्णधार म्हणून दीपेंद्र सिंग ऐरीची साथ मिळेल. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकातील नेपाळचा हा तिसरा सहभाग आहे.

**नेदरलँड्स :** नेदरलँड्सने युरोपियन प्रादेशिक पात्रता फेरीत इटलीसोबत पुढे जात, चारपैकी तीन सामने जिंकून गटात अव्वल स्थान पटकावले आणि आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकातील आपला सातवा सहभाग निश्चित केला. त्यांनी या स्पर्धेत दोनदा गट टप्प्याच्या पलीकडे मजल मारली आहे आणि सलग तिसऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकात कर्णधार स्कॉट एडवर्ड्सच्या नेतृत्वाखाली ते गट 'अ' मध्ये सह-यजमान भारत, पाकिस्तान आणि अमेरिकेविरुद्ध खेळण्यासाठी सज्ज आहेत. आमच्या संघाकडे 'डेप्थ' आणि विविध पर्याय आहेत, जे प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध आणि या परिस्थितीत प्रभावी ठरतील असा आम्हाला विश्वास आहे, असे मुख्य प्रशिक्षक रायन कुक म्हणाले. गेल्या काही विश्वचषकांचा अनुभव, आमच्या गटातील सर्व संघांविरुद्ध अलीकडेच खेळण्याचा अनुभव आणि श्रीलंका व भारतातील परिस्थितीची माहिती असल्याने, गेल्या काही महिन्यांतील आमच्या तयारीवर आम्हाला विश्वास आहे.

**ओमान:** ओमानने उपरोक्त आशिया-ईएपी प्रादेशिक पात्रता फेरीच्या सुपर सिक्स टप्प्यात नेपाळनंतर दुसरे स्थान पटकावून आपल्या चौथ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकातील स्थान निश्चित केले. नादीम खान आणि जितेन रमणंदी यांनी पात्रता फेरीत प्रत्येकी ११ बळी घेतले, तर ओमानचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वकालीन सर्वाधिक धावा करणारा फलंदाज, जतिंदर सिंग, २०२४ च्या स्पर्धेत खेळू न शकल्यानंतर आता संघाचे नेतृत्व करणार आहे. पात्रता मिळवल्यानंतर कर्णधार म्हणाला: हा एक अभिमानाचा क्षण आहे, मुले या स्पर्धेसाठी खूप उत्सुक आहेत. अशा उच्चस्तरीय स्पर्धेत खेळण्यासाठी अनुभवाची गरज असते, त्यामुळे तो अनुभव मिळवून देण्यासाठी आम्हाला पात्रता फेरी खेळायला मिळाली, प्रशिक्षक म्हणून मुंबईच्या सुलक्षण कुलकर्णी, यांनी या संघात कमालीचे बदल घडवून आणले आहेत.

# जोकोव्हिच-अल्कराझ अंतिम फेरीत

## महामुकाबल्याकडे अवघ्या क्रीडाविश्वाचे लक्ष ; रविवारी रंगणार सामना

| मेलबर्न | वृत्तसंस्था |





विश्वभरातील तमाम टेनिसप्रेमींनी शुक्रवारी दोन दर्जेदार आणि तितक्याच थरारक लढतींचा आनंद लुटला. सर्वाधिक ग्रँडस्लॅम विजेता सर्बियाचा नोव्हाक जोकोव्हिच आणि जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी विराजमान असलेला स्पेनचा कार्लोस अल्कराझ यांनी ऑस्ट्रेलियन ओपन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारताना अनुक्रमे इटलीचा यानिक सिनर व जर्मनीचा अलेक्झांडर इव्हेरेव्ह यांना धूळ चारली. त्यामुळे आता रविवारी रंगणाऱ्या महामुकाबल्यात कोण बाजी मारणार, याकडे अवघ्या क्रीडाविश्वाचे लक्ष लागून असेल.

दरम्यान, रॉड लेव्हर एरिना येथे शुक्रवारी झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात अग्रमानांकित अल्कराझने तिसऱ्या मानांकित इव्हेरेव्हला ६-४, ७-६ (७-५), ६-७ (३-७), ६-७ (४-७), ७-५ असे पाच सेटमध्ये पराभूत केले. २२ वर्षीय अल्कराझने तब्बल ५ तास आणि २७ मिनिटांच्या कडव्या झुंजीनंतर इव्हेरेव्हवर सरशी साधली. अल्कराझच्या नावावर सहा ग्रँडस्लॅम जेतेपदे असली, तरी त्याने प्रथमच ऑस्ट्रेलियन ओपनची अंतिम फेरी गाठली आहे. तसेच गतवर्षी इव्हेरेव्हनेच उपांत्यपूर्व फेरीत अल्कराझला या स्पर्धेत नमवले होते. यावेळी अल्कराझने त्या पराभवाचा वचपा काढतानाच पहिल्या ऑस्ट्रेलियन जेतेपदाच्या दिशेने कूच केली आहे.अल्कराझला आता करियर स्लॅम पूर्ण करण्यासाठी रविवारी जोकोव्हिचला नमवावे लागेल. कारकीर्दीत चारही ग्रँडस्लॅम स्पर्धा किमान एकदा जिंकल्यावर खेळाडूचे करियर स्लॅम पूर्ण होते. अल्कराझने फ्रेंच (२०२४, २०२५), विम्बल्डन (२०२३, २०२४), अमेरिकन ओपन (२०२२, २०२५) प्रत्येकी दोन वेळा जिंकली आहे. उपांत्य लढतीत दुसऱ्या सेटनंतर अल्कराझ काहीसा चाचपडतानाही दिसला. एकवेळ तो लढत अर्धवट सोडून माघारी परतेल, असे वाटले. मात्र वेळीच उपचार घेऊन अल्कराझने पुनरागमन केले. २८ वर्षीय इव्हेरेव्हला कारकीर्दीतील पहिल्या ग्रँडस्लॅमसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागेल.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात चौथा मानांकित जोकोव्हिच आणि द्वितीय मानांकित सिनर आमनेसामने आले. सिनर सध्या फॉर्मात असल्याने अनेकांनी तोच विजयी ठरेल, असे भाकीतही वर्तवले होते. त्यातच जोकोव्हिच उपांत्यपूर्व लढतीत दोन सेट पिछाडीवर असताना प्रतिस्पर्धी खेळाडूने दुखापतीमुळे माघार घेतल्याने उपांत्य फेरीत दाखल झाला होता. मात्र, जोकोव्हिचने अनुभव पणाला लावत तब्बल ४ तास व ९ मिनिटांच्या संघर्षानंतर सिनरवर ३-६, ६-३, ४-६, ६-४, ६-४ अशी मात केली.

२४ वर्षीय सिनरने २०२४ व २०२५मध्ये ऑस्ट्रेलियन ओपनचे जेतेपद पटकावले होते. मात्र यंदा त्याची हॅटट्रिक हुकली. तर ३८ वर्षीय जोकोव्हिच आता विक्रमी २५ व्या ग्रँडस्लॅम जेतेपदापासून फक्त एक पाऊल दूर आहे. जोकोव्हिचने तब्बल ११ व्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनची अंतिम फेरी गाठली आहे, तर अल्कराझने प्रथमच या स्पर्धेत इथवर मजल मारली. त्यामुळे दोघांमध्ये कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### सर्वाधिक रंगलेला सामना

अल्कराझ-इव्हेरेव्ह यांच्यातील उपांत्य लढत तब्बल ५ तास २७ मिनिटे रंगली. ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच एखादा उपांत्य सामना इतका वेळ रंगला. यापूर्वी २००९मध्ये राफेल नदाल आणि फर्नांडो वर्डास्को यांच्यातील उपांत्य लढत ५ तास १४ मिनिटे रंगली होती. तब्बल १७ वर्षांनी हा विक्रम मोडीत निघाला.



## फ्लेक्सो किंगला विजेतेपद

**मुंबई :** फ्लेक्सो किंग-लेबल डिव्हिजन संघाने ड्रिम एकादश संघाचा २७ धावांनी पराभव करत नोबल प्रिंटिंग प्रेस आयोजित मर्यादित षटकांच्या आंतर कार्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

ड्रिम एकादश संघाच्या गोलदाजांच्या भेदक माऱ्यासमोर फ्लेक्सो किंग संघाच्या फलंदाजाना मोठी धावसंख्या उभारता आली नाही. त्यांना निर्धारित षटकांमध्ये ५ फलंदाजांच्या मोबदल्यात फक्त ६८ धावा करता आल्या. त्यानंतर फ्लेक्सो किंगच्या गोलंदाजांनी फलंदाजांचे अपयश धुऊन टाकताना ड्रिम एकादश संघाला ६ बाद ४२ धावांवर रोखत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.


स्पर्धेचे प्रमुख संयोजक विजय चमारिया आणि पराग चमारिया यांच्या हस्ते चषक देऊन खेळाडूंना गौरव करण्यात आला.

## राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धेत जिल्ह्याची नेत्रदीपक कामगिरी

| उरण | प्रतिनिधी |




मास्टर्स गेम्स असोसिएशन आयोजित पहिली संयुक्त राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धा २०२६ नाशिक येथे २८, २९ जानेवारी रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेत श्री समर्थ कृपा स्पोर्ट्स अकॅडमी दादरपाडाच्या प्रशिक्षकांनी नेत्रदीपक कामगिरी केली. उरण तालुक्याचे स्नेहल पालकर यांनी ३५ वर्षांवरील पुरुष या गटामधील ४०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे आणि थाळीफेक सुवर्णपदक, चेतना पालकर यांनी ३५ वर्षांवरील महिला ४०० धावणे, ८०० मीटर धावणे आणि तिहेरी उडी स्पर्धेत सुवर्णपदक समाधान कणेकर यांनी ३५ वर्षांवरील पुरुष या गटामधील ४०० मीटर हर्डल्समध्ये सुवर्णपदक आणि १५०० मीटर धावणे रौप्यपदक तसेच २०० मीटर धावणेमध्ये कांस्यपदक तसेच त्यांचे खोपोली येथील अमित विचारे यांनी ४० वर्षांवरील पुरुष या गटांमधील १०००० मीटर धावणे, ५००० मीटर धावणे, १५०० मीटर धावणे सुवर्णपदक. दिलीप विचारे यांना ५५ वर्षांवरील पुरुष गटामध्ये २०० मीटर धावणे कांस्यपदक, महेश भोसले यांना ५ किमी जलद चालणे रौप्यपदक, मनीष खवळे बांबू उडीमध्ये कांस्यपदक, दत्ता दांगड नेमबाजीत कांस्यपदक मिळाले. रूपेश म्हात्रे उंचउडी, ११० मीटर अडथळा शर्यतमध्ये सुवर्णपदक आणि तिहेरी उडीमध्ये कांस्यपदक, विश्वास खुटले भालाफेक स्पर्धेत रौप्यपदक तसेच रिले आणि मिक्स रिलेमध्ये सुवर्ण आणि रौप्यपदक प्राप्त करून महाराष्ट्राला चॅम्पियनशिप मिळवून देण्यात मोठे योगदान दिले.



## ऑस्ट्रेलियाचा संघ जाहीर

| मेलबर्न | वृत्तसंस्था |

७ फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली खेळवल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ साठी ऑस्ट्रेलियाने आपला अंतिम १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. मात्र, स्पर्धे पूर्वीच कांगारूंना मोठा धक्का बसला असून, स्टार वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर झाला आहे. दुसरीकडे, अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथला पुन्हा एकदा डावलण्यात आले आहे. संघात दोन मोठे बदलऑस्ट्रेलियन निवड समितीने जाहीर केलेल्या अंतिम संघात एकूण दोन महत्त्वाचे बदल केले आहेत.

पाठीच्या दुखापतीमुळे त्रस्त असलेल्या पॅट कमिन्सच्या जागी डावखुरा वेगवान गोलंदाज बेन ड्वार्शियस याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच, सलामीवीर फलंदाज मॅथ्यू शॉर्टला डच्चू देऊन त्याच्या जागी मॅथ्यू रेनशॉला संघात स्थान दिले आहे. जोश हेझलवूड, टिम डेव्हिड आणि नॅथन एलिस या तिघांनाही तंदुरुस्त घोषित करण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियाचा अंतिम टी-२० विश्वचषक संघ : मिचेल मार्श (कर्णधार), जेवियर बार्टलेट, कूपर कॉनोली, टिम डेव्हिड, बेन ड्वार्शियस, कॅमेरून ग्रीन, नॅथन एलिस, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुह्नमन, ग्लेन मॅक्सवेल, मॅथ्यू रेनशॉ, मार्कस स्टोइनिस, डम झम्पा.

## गुड मॉर्निंग स्पोर्ट्स क्लब विजयी

| मुंबई | प्रतिनिधी |



दादर येथील अमर क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित किशोर गट कबड्डी स्पर्धेत अटीतटीच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्ट्स क्लबने लालबागच्या समर्थ स्पोर्ट्स क्लबवर अवघ्या ५ गुणांच्या फरकाने निसटता विजय मिळवत गजानन गोसावी अमर चषकावर आपले नाव कोरले.

दोन्ही संघात अंतिम सामना अत्यंत थरारक झाला. सुरुवातीपासूनच दोन्ही संघांनी आक्रमक पवित्रा घेतल्याने सामन्यात मोठी प्रेक्षकांना चुरस पाहायला मिळाली.

चढाया आणि पकडींच्या जोरावर दोन्ही संघांनी शेवटच्या क्षणापर्यंत एकमेकांना कडवी झुंज दिली. मात्र निर्णायक क्षणी गुड मार्नग संघाने आपला संयम राखत ५१-४६ अशा गुणफरकाने जेतेपद पटकावले.

गुड मॉर्निंगच्या विजयात पियूष पारडेच्या अष्टपैलू खेळाने मोलाचा वाटा उचलला, तोच सर्वोत्कृष्ट चढाईपटू ठरला तर अंश पांढरेला सर्वोत्कृष्ट रक्षकाचा किताब देण्यात आला.

उपविजेत्या समर्थ स्पोर्ट्स क्लबच्या पराभवानंतरही मयंक थोटेने आपल्या अष्टपैलू खेळाने सर्वांची मने जिंकली. तोच स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. या स्पर्धेत रंगदार सामने प्रेक्षकांना पाहायला मिळाले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)